नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

या अंकात

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संपादक
मा. नी. गलगलीकर

वर्ष २०] आक्टोबर १९६५ [अंक ६

स्मृ ति सौ र भ

मी लढाईच्या विरुद्धच आहे. पण ज्याला लढण्याची इच्छा असेल त्याला मी लढ म्हणून सांगेन हे खरे. माणसाचे मन आवेशांनी भरलेले असते हे मी कबूल करतो. माणसाने मरायला शिकायचे तर त्या अगोदर त्याच्यात मरण्याची शक्ती असली पाहिजे. लढणे हे बरे की नाही असा माझा सल्ला कोणी विचारायला आला तर मी त्याला स्पष्ट सांगेन की बरे नाही. पण कोणी मनात लढणे हे चांगलेच अशी निश्चित प्रतीति घेऊन आला, पण आजच्या प्रसंगी लढणे हे चांगले की नाही याविषयी त्याला शंका आहे, तर मी त्याला सल्ला देईन की आजची घटका लढाईत भाग घेण्याची आहे.

—गांधी विचारदर्शन

अनुक्रमणिका

संपादकीय

युगवाणीचे स्वरूप कसे असावे यावद्दल थोडीफार चर्चा करण्याचा आज विचार आहे. युगवाणीचे स्वरूप जास्त ललित होत चालले आहे. त्यापेक्षा महाराष्ट्र साहित्य पत्रिकेप्रमाणे युगवाणीचे स्वरूप असावे अशा प्रकारची सूचना करण्यात आली आहे. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे स्वरूप मुख्यत: चर्चात्मक–समीक्षणात्मक आहे. युगवाणीचे स्वरूप तसे असण्यास प्रत्यवाय नसावा. तरी पण ललित साहित्य प्रामुख्याने यावे अशी हालचाल आम्ही का करीत आहोत ? विदर्भ साहित्य संघाच्या सामान्य सभासदाने युगवाणीतील साहित्य वाचावे आणि ते फक्त हस्तिदंती मनोऱ्यातील उच्च–भ्रूसाठी आहे अशी त्याची समजूत होऊ नये असा एक विचार ललित साहित्य लिहितांना आमच्या मनाशी आहे. त्यासोवत दुसराहि एक दृष्टिकोन येथे व्यक्त करावा, असे मला वाटते. मराठवाडा आणि विदर्भ या दोन विभागांतून प्रतिष्ठान आणि युगवाणी ही त्या त्या साहित्य संघाची मुखपत्रे निघतात. प्रतिष्ठानमध्ये सुद्धा ललित–साहित्य येत असते. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेप्रमाणे प्रतिष्ठानचे स्वरूपहि चर्चात्मक–समीक्षणात्मक असण्यास हरकत नव्हती. तरी पण ते तसे सर्वस्वी नाही, त्याचेहि कारण काय असावे ?

महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे स्थान वैशिष्ठ्यपूर्ण आहे. पश्चिम महाराष्ट्रात विशेषत: मुंबई–पुण्यावरून कितीतरी मासिके प्रसिद्ध होत असतात. त्या भागातील साहित्यिकांना आपले कथा, काव्य, निबंध इत्यादि ललित लेखन विविध मासिकांतून छापून घेणे सुलभ जाते. त्यांच्या लेखनाला प्रातिनिधिक स्वरूप देण्याचा प्रश्नच नसतो. त्या मासिकांचा महाराष्ट्रभर संचार असतो. त्यामुळे साहित्य परिषदेचे मुखपत्र महाराष्ट्र साहित्य पत्रिका आपले चर्चात्मक समीक्षणात्मक वैशिष्ठ्यपूर्ण स्थान निर्माण करू शकते. ललित साहित्य त्यातून दिले जात नाही. याचे कारण ललित साहित्य त्यातून देण्याची तादृशत: गरज नाही. त्या विभागातून निघणाऱ्या नानाविध नियतकालिकांतून ती गरज सहज सुलभरीत्या पूर्ण होते.

मराठवाडा आणि विदर्भ या विभागातून अत्यल्प प्रमाणात मासिके प्रकाशित होतात. या विभागातील ललित आणि ललितेतर साहित्य मागणी-शिवाय पुरवठा, या सदरात जाऊन वसते. त्यामुळे हे साहित्य निवडून प्रातिनिधिक स्वरूपात प्रकाशित करण्याची जवाबदारी येथील साहित्य संघाच्या मुखपत्रांवर येऊन पडते. प्रतिष्ठानचा उल्लेख येथील संदर्भात येवढ्याचसाठी केला आहे. ललित साहित्य आणि ललितेतर; समीक्षणात्मक–संशोधनपर साहित्य यांचा

उत्तम समतोल प्रतिष्ठानने साधला आहे. युगवाणीची वाटचाल त्या रोखाने आता चालू झाली आहे. तिला ईप्सित ध्येयाकडे पोचविण्याचे कार्य विदर्भातील साहित्यिक कलावंतांचे आहे. युगवाणीसंबंधी ज्या प्रमाणात त्यांना आत्मीयता वाटेल त्या प्रमाणात युगवाणीचे स्वरूप बदललेले दिसेल.

* * *

भारताच्या सीमेवर घनघोर युद्ध सुरू झाले आहे. कुरापतखोर पाकिस्तानला धडा शिकविण्याचा आपल्या जवानांनी चंग बांधला आहे. भारताच्या तेजस्वी नेतृत्वाचे त्याला पाठबळ आहे. राष्ट्रीय संरक्षण निधीकडे पैशाचा ओघ चालू झाला आहे. येथपर्यंत सर्व ठीक आहे. पण आजच्या सर्वकश युद्धाच्या काळामध्ये देशाच्या संरक्षणासाठी केवळ सेनेवर विसंबून राहाणे योग्य होणार नाही. अंतर्गत मुलकी व्यवस्थेला तडा जाणार नाही, उलट तिला सक्रीय सहकार्य लाभेल अशा योजना त्वरित कार्यान्वित व्हाव्यात. कुठल्याहि सामाजिक, राजकीय, वैयक्तिक, धार्मिक अन्यायाविरुद्ध मोर्चाचा जल्लोश करणे, आमरण उपोषणाच्या घोषणा करणे आणि शासनावरचा ताण फाजिल प्रमाणात वाढविणे असल्या 'विधायक' कार्याचे आता विस्मरण व्हावयास हवे. देशातल्या मध्यभागात राहाणाऱ्या सुदैवी लोकांना युद्धाची प्रत्यक्ष झळ लागण्याचा संभव कमी असतो. युद्धाच्या खाली जे प्रत्यक्षपणे अवतरले आहेत त्यांचे स्मरण जागृत ठेवून फाजिल उत्साहाच्या भरात आपली शक्ती निरर्थक पण भडक कृतीमध्ये खर्च होऊ नये यासाठी जागृतपणे प्रयत्नशील असणे ही आजची गरज आहे. देशाच्या बचावाची दुसरी फळी आपण जितक्या तत्परतेने सांभाळू तितक्या प्रमाणात आपल्या देशहिताची कळकळ यथार्थ ठरेल.

* * *

आयातीतील नवीन निर्बंधामध्ये पुस्तकांचाहि समावेश झाला आहे. अलेक्झांड्रा येथील वाचनालय जाळणाऱ्या एका मध्ययुगीन जुलमी सत्ताधिकाऱ्याचे उद्‌गार येथे आठवतात. "कुराणात लिहिले आहे ते या ग्रंथालयात असल्यास त्या ग्रंथालयाचा उपयोग नाही, कुराणात लिहिले आहे त्यापेक्षा जास्त यात असल्यास यातील ज्ञान पाखंड होय. अतएव हे जाळलेच पाहिजे." भारताला जे ज्ञान प्राप्त झाले आहे ते पुरे आहे. जादा ज्ञानाचा भर कशाला ? ही विचारसरणी या निर्बंधाच्या मुळाशी असेल असे म्हणवत नाही. तरीपण निर्बंध आले आहे ही वस्तुस्थिती आहे आणि दुर्लक्ष करण्यासारखी ही बाब नव्हे. "प्रज्वालितो दीप इव प्रदीपात्" ह्या विचारसरणीत भारतीय मनाचे प्रतिबिंब आहे. ते प्रतिबिंब त्वरित दृग्गोचर व्हावे ही अपेक्षा.

मा. नी. गलगलीकर

अनुक्रमणिका

कविता

शिशिरागम

विविधवृत्ति विविधाविष्कार देत देत. .
शिशिरागम सुचवित ये की वसंत येत !

काळवंडली विशाल सागवानपाने
कोळजला मोहर हा भग्नहृदयतेने
चांफा तर पूर्ण नग्न वन्यपुरुष, आणि—
वेळू पिवळापिवळा बुद्धभिक्षु कोणी
आणिक चापट चिपळचा घेउनी शिशिर
वारकरी आळवितो पांडुरंगजीस
हरित गालीचा गेला चढविते खडावा
करूण आळवीत भाव संतिणिचा धावा
.....चिंचवटाचा परंतु तोच नोकझोक
ताड उंच डोकावुन बाळगती धाक !
आणि थांबला वारा हालते न पान
शिशिराच्या धाकाने तेहि काय सुन्न ?
पळस धरी शोभिवंत हे फुगे फुलांचे
खेळण्यात बालभाव दावितो मजेचे
सान फळे धरुनी ही सज्ज आंबराई
विफल मानवापुढती उभी स्निग्ध आई
शिशिरागम सुचवित ये की वसंत येत
विविधवृत्ति विविधाविष्कार देत देत.

—यादव मुकुंद पाठक

वेगळी वाणी

(आकुंचित) विस्ताराच्या आकाशात
तुझ्या व्यथेची चांदणी मिरवत असते
तेव्हा डोंगर—दु:खाच्या लाटा उसळतात—
आभाळा एवढ्या !
आणि
(अल्पानुभूतीच्या) अंत:प्रेरणेने भारावलेली लेखणी
लिहू लागते
तुझ्या दु:खाची गाथा—
नक्षीदार, चित्रमयी—
आकारा एवढी !
—म्हणून तू, तू आहेस
आणि व्याधाच्या बाणाने स्फुरलेली वाणी
वेगळीच आहे
वेगळीच !

खुणा

सिंहाने महागर्जनेचा आविर्भाव केला
तेव्हा नि:श्वासांचे एक वादळ
न उमटता वाऱ्यांवर
विखुरले वातावरणात !
तुडुंब भरलेल्या ढगातून
काजळाचा पडला पाऊस
सूर्यावरच फक्त !
अडली होती बाळंतीण
मूल होते आडवे
अन् घडत नव्हते कडवे !—

—प्रभाकर चांदेकर

सुख

डोळ्यांना नेत्र नाही म्हटले
तरी आता भागते.
आसूही अनिवार्य नाहीत
नेमाने येणाऱ्या पावसाळ्याप्रमाणे.
भांडी घासून
खरखरीत झालेले तिचे हात.
(आता पाठ वेगळी खाजवावी लागत नाही)
पाय पोटाशी घेतले
म्हणजे पांघरुणच उरते दशांगुळे
(पुस्तकांतल्या परमेश्वरासारखे)
डोळ्यांना नेत्र नाही म्हटले
तरी आता भागते
नेत्रबिंदूची एखादी शिशी असली
म्हणजे हप्ताभर
सारे कसे लख्ख दिसू लागते.

—वामन इंगळे

एकरूपता

तू दूर राजसा चंद्र नभी होऊनी
पाकळी पाकळी फुलेल तव किरणांनी ।।
तू जरी किनारा वाट जरी घनदाट
भेटेन होऊनी मी भरतीची लाट ।।
आकाश होऊनी चकवशील मज पुरती
क्षितिजावर टेकिन ओठ होऊनी धरती ।।
तूं हसशिल निर्गुण निराकार होऊन
मीरेची होऊन व्यथा तुला भेटेन ।।
ही एकरूपता तुझीच होइल छाया
ब्रह्माविण कैशी जगेल वेडी माया ।।

—सौ. उषा लिमये

एक दिठीची मासळी

एक दिठीची मासळी
मुक्या मुक्याच हासली
खुळी गालांच्या खळीत
कशी लपून बसली

एक दिठीची मासळी
चंद्र चुंबाया उडाली
मागे परतून पुन्हा
खोल पाण्यात बुडाली

एक दिठीची मासळी
माझ्या मनात पोहली
धरू अंजुलीत जाता
बोटांतून निसटली

—गुणाकर देशपांडे

गठडी !

.....जरा कुठे आला होता वसंत
आली शिशिराची थंडी
जरा कुठे हलकेले होते पाउल
वळविली पानझडीने गठडी !

—शरच्चंद्र गो. इंगळे

अनुक्रमणिका

शब्द-सामर्थ्य

श्री. विनय कुमार काटे

लेखक एखाद्या विषयावर लिहू लागला म्हणजे वर्ण्यविषयाचे नाव साहजिकच वारंवार वापरावे लागते, परंतु ते कर्णकटू वाटू लागल्यामुळें समानार्थक पण वेगवेगळे शब्द तो उपयोगात आणतो. जुने संस्कृत कोश केवळ अशा शब्दांच्या जंत्र्या झालेले आहेत. उदाहरणार्थ " 'मनुष्यो मानुषो मर्त्यो मनुजो मानवो नरः'—इत्यमरः।" हे एकाच **अर्थाचे** अनेक **शब्द** आहेत. याच्या उलट, कधी चुकून तर कधी जाणूनबुजून **एकाच शब्दाचे अनेक अर्थ** घेतल्या गेल्यामुळे श्लेष, कोटि, द्वयर्थी रचना घडून येते. त्यातही दोन अर्थांचे एक, दोन किंवा बहु शब्द योजिल्यामुळे अधिकाधिक चांगले चुटके साधतात. उदाहरणार्थ, नवशिक्या पाद्र्याने पहिल्याच प्रवचनाकरता केलेल्या टिपणातून सर्वात खालचा कागदाचा कपटा एका मिष्किल मुलाने कठड्याखाली वाकून प्रवचनपीठावरून (phepit) पळवला. बायबलाच्या पहिल्या (जेनेसिस) प्रकरणातला आदम आणि ईव यांचा पहिलाच संवाद निरूपण करता करता प्रवचक भांबावले. 'आदम ईवला म्हणाला... (शोध घेत) मग तो तिला म्हणाला...आणि आदम ईवला म्हणू लागला—(आपल्याशीच) "एक पान जाग्यावर दिसत नाही !"[१]

इथे 'पान' या शब्दाचे 'पिंपळपान' आणि 'कागदाचा तुकडा' असे दोन वेगळे अर्थ क्रमशः श्रोत्यांनी आणि वक्त्याने घेतल्यामुळे विनोद घडून येतो. दोन शब्दांचे दोन-दोन अर्थ घेतल्यामुळे घडणारा हा प्रकार पहा—दोन विद्वान सामाजिक (सोशल) महिलांविषयी चर्चा करीत असता (विद्वान लोक शिळोप्याच्या गप्पात हाच विषय अधिक चघळतात अशी मला शंका येऊ लागली आहे !) एकजण विचारतो काय हो, बायकांसाठी क्लब (क्रीडामंडळ, पक्षी दंडुका) असावेत काय ?[२] दुसरा हो, आपला शेवटचा आसरा (निवारा, पक्षी आयुध) म्हणून काही हरकत नाही ! या ठिकाणी एकाच शब्दाच्या द्वयर्थीपणाने भागत नाही. दुसऱ्याही शब्दाला दोन अर्थ असावे लागतात. असाच परिणाम मागे उल्लेखिलेल्या फारसी संवादात 'सम्बोसा' आणि 'मादर' या जोडगोळीमुळे साधतो.

---

१ मूळ इंग्रजीत 1. And Adam said to Eve... '*leaf* seems to be missing ?'

2. 'Do you believe in *clubs* for women ?' 'Yes, as a last *resort* !'

जीवनाची गती वाढत गेल्यामुळे काळ, श्रम, धन आणि साधन यांची बचत करण्यासाठी ज्याप्रमाणे तारेचे संक्षिप्त पत्ते आपण ठरवतो, तसेच पूर्वी कागद-टंचाई—किंबहुना अभावच—किंवा काव्य नियमबंधन अशा कारणास्तव शब्द समासात जोडणेही आवश्यक असे. शब्दांचे असे गठबंधनही कौशल्याने करावे लागे. मराठी काव्याची समीक्षा करताना टीकाकारांनी विदेशी व देशी, तलम किंवा तद्भव शब्दांना एकाच समासात गुंफण्यावर योग्य आक्षेप घेतला आहे. कोमल आणि कठोर ध्वनी असलेले शब्दही एकत्र आणल्यास मोठा विरस होतो. या समासातून घटक (दोन किंवा अधिक) शब्दांचे अर्थ कसे एकवटतात याचे व्याकरणात निश्चित नियम आहेत. चिनी लिपीमुळे चिनी भाषेत मात्र दोन शब्द समस्त करण्याने काही तरी अस्ताव्यस्तच अर्थ प्रगट होतो. उदाहरणार्थ, ‘सूर्य’ आणि ‘चंद्र’ यांची चिह्नं जवळ जवळ काढली की चिनीत ‘प्रकाश’ प्रकट होतो. (तसेच ‘मुलगा’ व ‘मुलगी’ शेजारी ओढली म्हणजे मधे—अंतर-पाटाची—रेघ न ओढताही ‘लग्न’ असा अर्थ निघतो). चिनीपेक्षा अधिक सुसंस्कृत अशा संस्कृत भाषेत समास—चातुर्य हे पराकोटीला पोचले होते असे म्हणायला काहीच प्रत्यवाय नाही. सध्याच्या ‘भिलशा’च्या आणि आसपास धुमाकूळ घालणाऱ्या ‘वेटवा’ नदीचे वर्णन अगदी दृष्टीसमोर रेखल्याप्रमाणे बाणभट्ट करतो ‘जलावगाहनावतारितजयकुंजरकुंभसिंदूरसंध्यायमानसलिलया वेत्रवत्या परिगता विदिशा नाम नगरी!’ भवभूतीच्या मालती—माधवामधे शाक्तपंथीयांच्या प्रार्थनेत ‘दंडक’ या ५४ अक्षरी वृत्तातील ४ पैकी पहिल्या ३ ओळी फक्त एकेका समासानेच व्यापल्या आहेत !

शब्द हे पुष्कळ अंशी पैशांप्रमाणे आहेत. विनिमयाचे ते प्रथम साधन आहेत. पुष्कळदा काही काही शब्दांचा भाव वाढतो. इतरांचा घटतो. नवे चलनात येतात, जुने वापरातून निघून जातात. शब्दांवरहि कवीकधी व्याज चढतं (व्याजोक्ती वेगळीच !). शब्द घडवले जातात, टाकवले जातात, त्यांची उधारी—उसनवारी होते. शब्द झिजून गुळगुळीत होतात, त्यांचा साठाहि करण्यात येतो. आणि अनेकदा उधळपट्टीहि करण्यात येते. शब्द पुष्कळदा खोटेहि असू शकतात. शब्द सौदा पटवतात—आणि करवतातहि. अनेक शब्दांची दर्शनी किंमतच जास्त असते आणि शब्दांचे मूल्यांकनहि वारंवार करावे लागते—म्हणूनच माझा हा खटाटोप आता मी आवरता घेतो.

उपनिषदात म्हटले आहे सर्वं वा इदं नाम च रूपं च । देवो रूपाणि चक्रिरे—वयं नामानि कृण्मसि ’।। हे सारं विश्व केवळ दोनच तत्त्वानी घडवलं आहे—नाम आणि रूप. देवाने ही अनुभव्य रूपं घडवली—आणि आपण त्यांना ‘नावं ठेवतो’ ! दृश्य वस्तू किंवा अदृश्य भावना यांच्याकरता शब्द घडवणारे

निर्मिति, त्यांचा सार्थ क्रम लावणारे कोशकार आणि या दैवी रूपांच्याच उत्पत्ति–स्थिति–लयाचा अभ्यास करणारे तत्त्वज्ञानी हे सर्व वस्तुतः एकाच विश्वाचीं सेवा करीत असतात. या तीन महान समाजसेवकांच्या चमत्कारावर एक ओझरती नजर टाकून ही लांवण संपवतो.

उपनिषदाप्रमाणे बायबलातली 'And out of the ground the Lord God formed every beast of the field, and every foul of the air; and brought them unto Adam to see what he would call them and whatsoever Adam called every creature, that was the name thereof. And Adam gave names to all cattle, and to the foul of the air, and to every beast of the field.... (Genesis)'. डोनाल्ड अॅडॅम्सने म्हटल्याप्रमाणे अॅडॅमच्या तोंडी घातलेल्या या सर्व–नामकरणाची प्रक्रिया ही अर्थातच पिढचान् पिढया चालत येऊन मग आधी मुखी व नंतर लेखी नियमवद्ध झाली असली पाहिजे. लेखन–कामाठीची प्रतिष्ठा जसजशी वाढू लागते तसतसे प्रयत्नपूर्वक विकट शब्द घटवले जातात आणि म्हणून Andrew Boyd ने Encounter च्या मार्च ६४ च्या अंकात प्रयत्न केल्याप्रमाणे On to Mon (फिरून एकाक्षरी भाषेकडे) अशा चळवळी मधून मधून चालू होतात. रोमन लिपीच्या इंग्रजी वापरात सुधारणा करण्यासाठी बर्नार्ड शॉनेही फार मोठा वारसा मागे ठेवला आहे, हे वाचकांस विदित असेलच.

ज्याप्रमाणे मनातला कल्लोळ कागदावर उतरवता आला की कवीला अपरिमित आनंद होतो तसंच समाधान योग्य शब्द निर्मिता आला की शब्द-साधकाला होतं. सुदैवाने संस्कृतमूलक भाषांमध्ये धातु, प्रत्यय, उपसर्ग इत्यादि अपरंपार साधनसंपत्ती असल्यामुळे अगदी अचूक अर्थ आविष्कारणाऱ्या अनेक धातुसाधितांचा कधीच तुटवडा पडत नाही. प्रारंभी शब्दाचा आस्वाद किंवा अर्थाकलन करणं केव्हा केव्हा विकट होतं हे मात्र खरं !

कोशकार्यामध्ये त्याच भाषेत अर्थ समजावणारे आद्य आंग्लकोशी डॉ. जॉन्सन किंवा परभाषेत पर्याय 'पाडणारे' आद्य अनुवाद–कोशकार डॉ. रघुवीर अशा दिग्गजांचं कार्य सर्वांनाच सुपरिचित आहे. जॉन्सनच्या patron किंवा oats या शब्दांच्या व्याख्या अथवा डॉ. रघुवीरांच्या 'भारतापमान' (आणि man–hole चा शब्दशः अनुवाद) अशा अट्टाहासी आणि म्हणून हास्यास्पद संज्ञा सोडल्यास त्यांच्या इतर कार्याचे मूल्यमापन भगीरथाच्या तुलनेनेच शक्य आहे. ('कंठलंगोट' किंवा 'अग्निरथ..' ह्या केवळ विनोदी वावडया आहेत !) अर्थात् अशा अंशतः सदोष शब्दकोशांचा तिर्यक आधार घेऊन (१९५० मध्ये गोंडवन क्लबात श्री. कामताप्रसाद सागरीय यांनी 'डॉ. शब्दवीर' या आपल्या

प्रहसनात केल्याप्रमाणे) 'मादक मंत्री उत्पात कर राशि संग्रह करना है' असे अघोरी (की घोर?) भाषांतरही घडू शकते. पण हे सर्व व्यावसायिक धोकेच (occuptional hazard) समजले पाहिजेत. पहिला पायंडा (पायोनियर!) पाडण्याचा पराक्रम करण्याचे श्रेय अशा आपत्ती किंवा आक्षेपांमुळे निरस्त होत नाही. त्यामागील अदम्य ध्येयवाद, अकाट्य तर्क आणि अथक परिश्रम यांची कल्पना भुक्तभोग्यांनाच येऊ शकेल. नाही तरी 'विद्वानेव विजानाति विद्वज्जनपरिश्रमम् । न हि वंध्या विजानाति गुर्वी प्रसववेदनाम् ॥'

या सर्व आडंबराच्याहि मागे गेल्यावर तत्त्वचिंतकाची किंवा दर्शकाची भूमिका स्पष्ट होते. Plato ने म्हटले आहे की 'जिज्ञासा आणि विस्मय (Curiosity and wonder) यातून तत्त्वज्ञानाचा उगम होतो.' आपल्या सहाही दर्शन–सूत्रात 'अथातो कर्मजिज्ञासा, धर्मजिज्ञासा कि. ा ब्रह्मजिज्ञासा' असाच प्रारंभ केला आहे. ही जिज्ञासा शमवण्याकरता शब्दांचा प्रयोग करण्याचा प्रयत्न होतो, पण पुढे असे आढळते की इथे मात्र शब्दांची शक्ती किंवा सामर्थ्य तोटके पडते. इंग्रजी म्हणीप्रमाणे

If speech is silver, silence is golden!

चिनी म्हण आहे

Speak, only if you can improve upon silence.

वेदांतातहि शब्दांनी ब्रह्म सांगतांना 'नेति नेति, अनिर्वचनीय' असंच म्हटलं आहे. याच निष्कर्षाप्रत पोचवणारी जी गोष्ट उपनिषदात आहे, तीत शिष्य गुरूला विचारतो, 'ब्रह्म काय आहे?' गुरू गप्प. तो पुन्हा पुसतो, 'आहे काय हे ब्रह्म?' पुन्हा गुरू चूप. तिसऱ्यांदा शिष्य सवाल टाकतो, 'काय, आहे काय ब्रह्म?' शेवटी आपली शांतता शिष्याला असह्य आहे हे उमजून गुरू त्याला समजावतात, 'अरे बाबा ही शांति हेच ब्रह्म!'

काशी हिंदु विश्वविद्यालयात असता माझ्या तिथल्या पहिल्या–आणि त्यांच्या अखेरच्या वर्षी डॉ. राधाकृष्णन तत्त्वज्ञानाचे काही तास घेत. भाषणाचा समारोप करतांना ते नेहमी म्हणत 'मुलांनो, मी इतका बोललो खरा, पण खरं सांगायचं म्हणजे प्राचीन ऋषींनी म्हटल्याप्रमाणे खरे प्रवचन न बोलताच होते– अवचनेन प्रोवाच!' आपल्याकडील ज्ञानेश्वरांनी तरी आणखी काय सांगितले आहे? (ज्ञानेश्वरी १, ५९)

हे शब्देवीण संवादिजे । इंद्रिये नेणता भोगिजे ॥
बोला आधी झोंबिजे : प्रमेयासी ॥

अनुक्रमणिका

श्री. वि. वा. जोशी यांच्याशी माझा परिचय ते सेवानिवृत्त अन् मी सेवेत रुजू झाल्यावर झाला. वनविभागातील दीर्घ नोकरीतून निवृत्त झाल्यावर श्री. जोशी चंद्रपूरच्या 'भारती' परिवारात सामील झाले. मध्यम उंचीचे, सावळचा वर्णाचे, साधी पॅन्ट, त्यात शर्ट खोचलेला, पायात चपला, कोट असला तर मानेवर कॉलरने झाकलेला, अशा कारकुनी थाटात जुनाट सायकलीवरून दुपारी 'भारती' कार्यालयात शिरणारे व सायंकाळी परतणारे जोशी मी पाहिले. त्यांचा वेष कारकुनाचा असला तरी कामात रुक्षता किंवा निस्तेजपणा नसे. सेवानिवृत्तीनंतरची ग्लानी त्यांच्या चेहऱ्यावर कधी दिसत नसे आणि लेखा-पालनासारख्या किचकट कामात ह्यात घालवूनही त्रासिकतेची छटा कधी त्यांच्या वागण्यातून प्रगट झाली नाही. उलट दिलखुलास हसत दुसऱ्यांना हसविण्याचे त्यांचे कसब मला नेहमी विलोभनीयच वाटले. मात्र या हसण्याहसविण्याच्या खेळात मध्यमवर्गीयांच्या वाटचाला आलेल्या अडचणींवर, त्यातच लाभलेल्या सुसंस्कारांनी मात केलेल्या आत्मविश्वासाची भावना तेवढी मात्र त्यांना केव्हाच लपवून ठेवता आली नाही. म्हणूनच रुक्ष व्यावसायिक जीवनातून निवृत्त झाल्यानंतरहि उत्साहाने ते घडपडणाऱ्या युवकांच्या उपक्रमात—'भारती' साप्ताहिकात वावरू शकले, रमू शकले.

श्री. वि. वा. जोशी यांचा जन्म चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूरला झाला. मध्यमवर्गीय कुटुंबात जन्म झाल्यामुळे त्यातील बऱ्यावाईट वैशिष्टचांचं लेणं त्यांना लाभलं. आर्थिक अडचणी आल्या तशी सोशिकताहि मिळाली. मध्यम-



श्री. वि. वा. जोशी

मदन धनकर

वर्गीयांच्या साऱ्या सुखदुःखांतून ते गेले. माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यावर पुढील शैक्षणिक वाट चालता आली नाही. पण उपजतच असलेल्या सद्विचारांना व संस्कारांना खतपाणी देऊन आपलं मन अधिक रसिक करता आलं. त्याचा उपयोग पुढे त्यांना लोकवाङ्मयाचे संकलन व संशोधन करतेवेळी प्रामुख्याने झाला. शिक्षण आटोपल्यावर काही काळ त्यांनी राजूरा, घुग्गुस व बल्लारपूर येथील खाणीत नोकरी केली. पण नंतर वन–खात्यात नोकरी धरली ती १९६२ साली निवृत्त होईपर्यंत.

श्री. जोशी यांनी शालेय जीवनातच वाङ्मयसेवेला प्रारंभ केला. वाचनाची आवड व पाठांतराची हौस यामुळे त्यांच्या हळव्या व भावनाप्रधान मनाने भक्ति-गीतांचे संकलन करण्याचा छंद घेतला. तर साहित्याच्या आवडीतून वाचकांसाठी ‘रडचा रंगेल’ निर्माण झालं. शालेय जीवनातील त्यांचे हे पहिले पुस्तक वाङ्मयसेवेची नांदी देणारे ठरले.

त्यानंतर व्यवसायाच्या निमित्ताने श्री. जोशी यांना पंचवीस वर्षे वनविभा-गात शहरी जीवनापासून दूर, आडवळणाच्या गावी काढावी लागली. वनखात्यात नोकरी करीत असताना ठिकठिकाणी बदल्या झाल्यामुळे भ्रमंती आपोआप घडली. चंद्रपूर जिल्ह्यातील वन म्हणजे निसर्गाचे वरदान ! उंचीत एकमेकांशी स्पर्धा करणारी सागाची झाडं, घनदाट जंगलाचे विस्तीर्ण पट्टे, वांबूची वने, वन्य पशूंचा संचार, दळणवळणाच्या साधनांची कमतरता, दूर दूर वसलेली वनग्रामे आणि पन्नासपासून पाचशेपर्यंत लोकवस्ती असलेल्या या गावांना जोडणाऱ्या अस्पष्ट पाऊलवाटा, अशा विभागात ते राहिले.

सृष्टिसौंदर्य आल्हाददायक असते ते क्षणिक फेरफटका करण्यात किंवा सोईच्या ठिकाणी वसलेल्या विश्रामगृहाच्या परिसरातून न्याहाळण्यात. वनाच्या हिरवट सौंदर्याची वर्णने पुस्तकात वाचताना लोभस वाटतात. मोटारीत बसून रस्त्याने धावताना आकाशाशी भिडणाऱ्या वृक्षांचा डौल कुणालाहि जाणवेल. सर्व सोईनिशी वन्य पशूंची शिकार करणं मर्दपणाचे व करमणुकीचेहि असते. वनसौंदर्याबद्दल वाचताना किंवा लिहिताना, वन्य पशूंच्या क्रीडा पाहाताना किंवा शिकार करताना मौज वाटते, अनेक कल्पना सुचतात व आनंद होतो. पण या आनंदाचा अनुभव फक्त फेरफटका करण्याशिवाय किंवा सहलीपेक्षा अधिक वेळ घेण्याची आपली तयारी नसते. सुधारलेल्या नागरी जीवनापासून दूर, दळण-वळणाच्या साधनांचा अभाव असलेल्या अशिक्षित लोकवस्तीच्या गावी वर्षानुवर्ष राहण्याची पाळी आली म्हणजे उबग येतो, मन बुजते आणि रुक्ष जीवनाचा कंटाळा येऊन माघारी फिरते.

श्री. जोशी अशा विभागात आनंदाने राहिले, तेथील सृष्टिसौंदर्यात रमले. या विभागात त्यांनी मुक्तपणे संचार केला. वन्य जीवनाच्या निरनिराळ्या अंगो-

अनुक्रमणिका

पांगाशी व पलूंशी ते समरस झाले. केवळ आकाशाकडे पाहात अजाणपणे वनसौंदर्य न्याहाळणाऱ्या वनग्रामातील एखाद्या खेडुताप्रमाणे त्यांनी आपले जीवन घालविले नाही अथवा तेथील स्वप्नाळू जगातच ते रममाण झाले नाहीत तर बदलत्या सृष्टीच्या रंगरूपात निथळणारे सौंदर्य त्यांनी साक्षेपाने पाहिले व त्याला शब्दरूप दिले. वन्य पशूंच्या लीला किंवा त्यांचे खेळ गंमत म्हणून पाहिले नाहीत, तर त्यातून प्रगट होणाऱ्या स्वभाववैशिष्ठ्यांना अलगद टिपून घेतले. करमणुकीसाठी जसा वनविहार केला व शिकार पाहिली तशी दुसऱ्यांची करमणूक करण्यासाठी ती रंगविली देखील.

श्री. जोशी यांचे शिकारविषयक वाङ्मय यातूनच निर्माण झाले. 'वनांतील मने', 'वन्य पशूंच्या मौजा', 'वनविहार', 'शिकारकथा' ही त्यांची पुस्तके याची साक्ष आहे. 'वनसौंदर्य' हे त्यांचे पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर आहे. प्रा. अनंत काणेकर यांची त्याला प्रस्तावना लाभली आहे. या विषयावर नियत-कालिकांतून त्यांचे अनेक लेखहि प्रसिद्ध झाले. त्यांच्या शिकारविषयक किंवा वनविषयक लिखाणातून त्यांनी वनसौंदर्य किती रसिकतेने अवलोकिले, वन्य पशूंच्या स्वभावातील बारकावे किती सूक्ष्मपणे टिपले आणि कविमनाने रंगविले हेच दिसून येते.

परंतु श्री. जोशी इथेच थांबले नाहीत. आपला व्यवसाय सांभाळूनहि ते अपरिचित लोकजीवनात मिसळले. लहान लहान गावात रहात असताना त्यांनी उत्सवादि कार्यक्रमात भाग घेतला. लोकगीते किंवा लोकगीतांच्या संकलनाची गोडी त्यांना कशी लागली यासंबंधीची मूल येथील घटना! आश्विन महिन्यात भुलाबाईची गौर मांडून लहान मुली भराड्या गौरीची गाणी म्हणत हिंडत असतात. ही गाणी श्री. जोशी यांना इतकी आवडली की, त्यांचा संग्रह करण्याचा ते प्रयत्न करू लागले. कित्येकदा मुलीना चणेभुरमुरे देऊन त्यांच्या-कडून ही गाणी म्हणवून घेतली.

पुढे असेच खेड्यापाड्यातून हिंडताना किंवा लहान गावी मुक्कामास असताना पहाटे जात्यावर गाइल्या जाणाऱ्या ओव्या व गाणी टिपून घेण्याचा उपक्रम ते करू लागले. रात्रीच्या वेळी शेकोटयावर बसून गप्पांच्या रंगात अनेक लोकगीते व कथा त्यांनी ऐकल्या व टिपून घेतल्या. हे करताना सर्वसामान्य जनात ते मिसळले, समरस झाले आणि त्यांच्या जिव्हेवरील अनेक गीते मोठ्या जिज्ञासेनं ऐकून टिपून घेतली. परंपरेने कथनातून जतन झालेल्या व अनेक वर्षापासून स्मरणात असलेल्या कथा ऐकून त्याचा संग्रह केला. रुक्ष व्यवसाय व तुटक लोकजीवन यांतूनहि लोकसाहित्याच्या संकलनाचे, संशोधनाचे महत् कार्य ते करू शकले, याचे कारण त्यांचे ठिकाणी असलेली सूक्ष्म निरीक्षक दृष्टी व उपजत जिज्ञासा. लोक-साहित्याच्या संकलनास व संशोधनास या गुणांची मदत झाली. एकापरीने त्यांना

लाभलेल्या परिसरातून त्याचे पोषणच होत गेले. शिवाय कष्टाळूपणा व चिकाटी यांची सोबत असल्याने या क्षेत्रात ते भरीव कार्य करून दूरची मजल गाठू शकले.

श्री. वि. वा. जोशी यांनी लोकवाङ्मयाच्या संकलनाचे कार्य १९३० पासून सुरू केले ते आजतागायत अव्याहत सुरू आहे. ३५ वर्षांपूर्वी साहित्याचे हे दालन म्हणावे तेवढे समृद्ध नव्हते, यात फारच थोडे वाङ्मय लोकांसमोर आले होते. कै. वैद्य यांचे 'कहाण्या', कै. राजवाड्यांची 'भोंडल्याची गाणी', श्री. त्रि. म. सुखटणकरांची 'गोव्यातील जानपद गीते' आणि श्री. शं. गो. दाते ह्यांचे 'लोककथा' भाग १ व भाग २ अशी निवडक पुस्तके वाचकांसमोर होती. त्यातच श्री. जोशी ह्यांनी प्रवेश केला. श्री. जोशी यांचे पहिले पुस्तक 'लोककथा व लोकगीते' १९३६ साली श्री. वनहट्टी यांच्या सुविचार प्रकाशन मालेतर्फे प्रकाशित झाले. हे त्यांचे पुस्तक यापूर्वी प्रकाशित झालेल्या अनेक नियकालिकांतील लोकगीते व लोककथा यांचा संग्रहच होते.

याच सुमारास प्रा. वा. कृ. चोरघडे यांचे 'साहित्याचे मूलधन' प्रकाशित झाले. यवतमाळचे श्री. पां. श्रा. गोरे 'वऱ्हाडी लोकगीते' घेऊन पुढे आले. त्यानंतर महाराष्ट्रात लोकसाहित्याचे संकलन व संशोधन विपूल झाले. सौ. मालतीबाई दांडेकर, कै. डॉ. कमलाबाई देशपांडे, श्रीमती दुर्गा भागवत, डॉ. सरोजनी बाबर, श्री. ना. रा. शेंडे आदींनी लोकसाहित्याचे दालन समृद्ध करण्याचा भरघोस प्रयत्न केला. आता तर महाराष्ट्र सरकारने "महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती"ची स्थापना करून याला जोराची चालना दिली आहे. त्यामुळे जनतेचे याकडे लक्ष तर वेधलेच पण खरेखुरे जिवंत वाङ्मय उपलब्ध होण्याची सोय झाली. श्री. जोशी सध्या लोकसाहित्य समितीचे सभासद आहेत.

गेल्या ३५ वर्षात अनेक नियतकालिकांतून श्री. जोशी यांची लोकगीते व लोककथा प्रसिद्ध झाल्या. 'स्त्री', 'मौज', 'स्वराज्य', 'लोकसत्ता', 'सकाळ', 'महाराष्ट्र', 'ग्राम–विकास', आदि नियतकालिकांतून मराठी वाचकांपुढे त्यांचे साहित्य आले. अनेक सभा–संमेलनांतून, परिसंवादातून व आकाशवाणीवरून यासंबंधी ते बोलले.

श्री. जोशी हे चंद्रपूरचे. चंद्रपूर जुन्या गोंडवनाच्या भागात मोडते. श्री. जोशींना स्वतःला चंद्रपुरी म्हणवून घेण्यात मोठा आनंद वाटतो. शिवाय त्यांनी लोकवाङ्मयाचे संकलन केले तेहि गोंडवनात व चंद्रपूरच्या परिसरात. म्हणूनच की काय आपल्या संग्रहांना "चंद्रपुरी लोककथा" व "गोंडवानी लोककथा" अशी नावे त्यांनी दिली आहेत. केवळ जनतेच्या जिभेवर कोरलेले वाङ्मयच संकलित करून ते थांबले नाहीत तर वाङ्मयातून प्रगट होणारे भाषेचे स्वरूप, वैशिष्ट्य व चालीरीती यांचा मागोवा घेऊन संशोधक व चिकित्सक दृष्टीने

संस्कृतीच्या विविध अंगावर प्रकाश टाकला. या दृष्टीने 'चंद्रपुरी भाषेचे स्वरूप' (लोकसत्ता) व 'चंद्रपुरी चालीरीती' (महाराष्ट्र) यासंबंधीचे लोककथा व गीते यांच्या आधारावर त्यांनी केलेले विवेचन मोलाचे आहे.. 'चंद्रपुरी लोककथा' यातील सांकेतिक विवाह, समईचे लगीन, संकेत सुंदरी यासारख्या कथा आपल्या शैलीने आकृष्ट करतात. 'चंद्रपुरी कवी' हा एक कविता संग्रहहि प्रकाशित करण्यात त्यांनी पुढाकार घेतला.

नागपूर नभोवाणीने १९५१ साली लोकसाहित्यावर एक भाषणमाला आयोजित केली. त्यासाठी प्रा. वनहट्टी, प्रा. डॉ. वि. भि. कोलते व प्रा. वा. कृ. चोरघडे आदींची एक समिती नियुक्त केली. त्यावेळी श्री. जोशी यांनी "लोकसाहित्यातील त्याग व सेवा" यावर दिलेले व्याख्यान बरेच गाजले. ते या समितीचेहि सदस्य होते.

श्री. जोशी यांना त्यांच्या प्रयत्नात पत्नी सौ. लिलाताई जोशी यांचे वेळोवेळी बरेच सहाय्य झाले. सौ. जोशी यांच्या काही कविता व कथा प्रकाशित झाल्या आहेत. श्री. जोशी यांची आजवर लहानमोठी मिळून सुमारे २५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यात शिकारविषयक व लोकसाहित्यविषयक वाङ्मया-बरोबरच कवितासंग्रहहि आहेत.

श्री. वि. वा. जोशी यांचे नाव गेल्या ३०–३५ वर्षांपासून मराठी वाचकां-पुढे आहे. त्यांच्या 'कवितेच्या दुकाना'तील चिजा अनेकांनी घेतल्या असल्या, शिकारविषयक थरारक कथा वाचल्या असल्या, तरी त्यांनी संकलित व संशोधित केलेल्या लोकसाहित्यानेच रसिकांची मने रिझविली आहेत.

अनुक्रमणिका

तरंगती ओवी

जयंत देवधर

एखादं नाजुक फूल उमलावं तशी झोप उमलते. हिरव्यागार गवतावर पाणी धावावं तशी जाग अंगात धावू लागते–सळसळू लागते.

शाल छातीपर्यंत ओढून मी दोन्ही हात चोळतो. हलकेच चेहऱ्यावरून फिरवतो. आईनं लहानग्याला कुरवाळावं तसं काहीसं मला वाटतं. आईची आठवण होते तेव्हा मी सहज उजवीकडे पाहतो. फिकट उजेडात भिंतीवर लावलेलं चित्र–छायाचित्र माझ्यावर ममता उधळीत असतं. डोळ्यांना फिकट उजेडाचा सराव होऊन पुसटसं दिसू लागतं. डावीकडे आधी एक फिकट आकृती दिसू लागते. जराशानं ती अधिक स्पष्ट होते. तो सुधाकर असतो. अंथरुणावर सकाळीच उठून बसून अंधारात पहात बसायची त्याची नेहमीचीच सवय. तो पुन्हा लवंडतो. मंद लयीत चालणारा त्याचा श्वास–आणि हळुवारपणे वरखाली होणारं ऊर. अचानक उमाळ्यानं माझं मन भरून जातं. माझी नजर त्याच्या आकृतीवरून फिरते. तिचीच ऊब त्याला मिळेल म्हणून.

मग मी माझी नजर ओढून घेतो. डोळे ताणून आढ्याला असणाऱ्या छिद्रातून प्रकाशाचा पांढुरका गोल माझ्या डावीकडच्या भिंतीवर पडलेला असतो. जणू आमच्यावर नजर ठेवून असलेला.

हळूहळू आजूबाजूच्या भिंतींचा टणक थंडपणा जाणवू लागतो. त्यांचे आकार मला घेरतात. भिंतींना असणारा खरपूसपणा माझ्या हाताला बोचू लागतो. त्या मला काचू लागतात. पुन्हा नजर ओढून घेऊन मी कसलासा विचार करत राहतो. उजवीकडे असलेली खिडकी नीटशी बंद झालेली नसल्यानं बारीक फटीतून वाऱ्याची झुळूक आत येते. बरोबर थंडीची एक अवखळ लाट घेऊन. खोलीभर एक निर्मळ ताजेपणा भरून जातो. मी जरासा टवटवीत होतो. सावधपणे पडून राहतो.

काल वाचलेली कादंबरीची नायिका अशीच ताजेपणानं रसरसलेली असेल. असाच टवटवीतपणा तिच्या भोवती नाचत असेल. असलंच भारावून टाकणारं तिचं अस्तित्व. . . .पापण्या जडावू लागतात आणि खिडकीच्या फटीतून नायिका आत येते. फटीतून आत शिरेल इतकी सडपातळ अन् मोगऱ्यासारखी तजेलदार.

अनुक्रमणिका

एखाद्या लाटेसारखी ती खोलीभर फिरते अन् हलकेच किणकिणत निघून जाते. मागे उरतो फक्त फुलवणारा सुगंध.

तिला बाहेर पडताना मी पाहतो. ती कुठं नाहीशी झाली असेल याचा विचार करीत राहतो—अदमास घेत राहतो. बाहेर कुठलीच जाग नसते आणि नायिका बाहेर पडते त्या खिडकीतून दिसतात निंबाच्या झुकलेल्या फांदीची अंधुक पानं.

पानावरून मला आठवतं. काल संध्याकाळी दिसलेली राकाजींच्या बागेतली ती कळी उमलली असेल. डेरेदार फणसाच्या सावलीत वाढणाऱ्या त्या कळीची पाकळी मला हवी तशीच उमलली असेल का ?

काल उगाचच त्या कळीबद्दल मला आपलेपणा वाटला होता. तिचं टपोर-पण माझ्या खास ओळखीचं आहे असं वाटलं होतं. त्या पाकळीनं माझ्याकडे बघून स्मित केलं होतं अन् त्याच प्रहराचं निमंत्रण दिलं.

नाजुक सुगंधाची नशा निश्चितपणे पण हलकेहलके माझ्या मस्तकात भिनू लागते. अंधुक जाणीव डोळ्यात विरघळू लागते.

...दूरवर पावलांचा आवाज येतो. तो आता असाच जवळ येईल. दोन अनुभवी, पिकल्या पावलांवरोवर दोन उमलती, अधीर पावलं पडत असतील. एका खणखणित उंच आवाजाला दुसरा कोवळा नाजुक आवाज लपेटत असेल आणि त्या स्वराच्या लडी आजुबाजूला, फुलापानांवर, घराघरांवर त्या ओल्या झिरझिरित वातावरणात उलगडत असतील.

..." मना सज्जना भक्तिपंथेचि जावे "—पिळून गेलेले तरी ताठ चालणारे विधिज्ञ मनोहर नातवाला घेऊन निघाले असतात. त्यांच्या कणखर, खंबीर पावलांवरोवर त्यांच्या पुढं पुढं धावत असतात—" मना सज्जना "च्या लाटा.

विधिज्ञ मनोहर वळणावरून पुढे सरकतात. स्पष्ट स्वर पुसटत जातात. माझ्या अंगांगात हेलावत राहते एक मधाळ ऊब. आणि फणसाच्या डेरेदार पिकल्या छायेखाली सर्वांगानं फुलणारी कळी मला खुणावत असते. तिच्या तांबुस ओठातून सांडत असतात शब्द—" मनाऽसज्जना. "

अजुनि चालतोचि वाट

वि. वा. जोशी, चंद्रपूर

होय; अजून चालतो आहे वाट, वय साठ, मान ताठ, सदैव मनात कल्पना काठोकाठ, त्या रेखाटण्यास सबळ हात. साठी आली पण हाती काठी आलेली नाही. चाळिशी संपताच डोळ्यावर 'चाळिशी' वसली होती; पण ती केव्हा डोळ्यावेगळी झाली हे कळलेसुद्धा नाही; शिवाय वाङ्मय हे मी उपजीविकेचे साधन म्हणून केव्हाही मानलेले नाही. तेव्हा उभ्या आयुष्यात त्याचे 'दास्यत्व' पत्करण्याची मला कधीच पाळी आली नाही. 'साहित्यनिर्मिती' हा एक जीवनातील अपूर्व आनंद आहे, या दृष्टीने मी पाहात आलेलो आहे. भावनेच्या ओलाव्याने सुख-दुःखाच्या गोष्टी सांगाव्या, लिहून काढाव्यात आणि तितक्याच सहृदयतेने कुणाला तरी वाचून दाखवाव्यात, श्रोत्यांच्या भावनांशी एकरूप व्हावे, असा हा सरळ मार्ग आक्रमीत अजूनही वाट चालतो आहे. मला नशिवाने मिळालेला व्यवसायच असा होता की साठ वर्षातील अत्यंत उमेदीची तब्बल तीस वर्षे काही वेळ अपवाद म्हणून सोडल्यास अक्षरशः निर्जन अरण्यात 'एकटी' घालवावी लागली. अजूनहि 'वनातला जनात' आलो असून एकटाच वाट चालत आहे. मित्रांचा गोतावळा नाही. शंका-समाधान करायला कुणाकडे जायची अगर चर्चा करायची सोय नाही. उत्तम उत्तम वाचायला मिळावे; आणि ते सुद्धा ताजे—याचीहि व्यवस्था नाही. 'संदर्भ ग्रंथालये' ही काय चीज आहे ती उभ्या आयुष्यात उपभोगिली नाही. जेवढं काही मिळालं तेवढं वाचलं; मनन केलं; आणि त्या अल्पशा बळावर लिहिलं.

शाळेत असताना 'स्वावलंवन' नावाचे हस्तलिखित मासिक निघायचे त्यात कधीमधी लेख, कविता मी देत असे; व स्वतः एक स्वतंत्र निव्वळ काव्यास वाहिलेले 'काव्यविकास' मासिक मी काढीत असे. चांगल्या मोठ्या हस्ताक्षरात ते निघे. जांभळ्या, लाल आणि निळ्या रंगाच्या शाईत ते काढले जाई. पुढे 'शंखध्वनि', व 'डंका' नावाची मासिकेही काढली पण हा सर्व 'पोरखेळ' वर्ष-सहा महिन्यांपलीकडे टिकू शकला नाही.

पहिली कृती, म्हणजे शालेय जीवनात लिहिलेल्या एका 'रडचा' नावाच्या मुलाच्या बारा छोटया छोटया गोष्टी. हा 'रडचा' अगदी व्यवहारशून्य (लेख-

कासारखाच). त्यामुळे जे जे काम त्याला सांगितले जाई तेथे त्याला पदोपदी अपयश येई व अपमान सोसावा लागे. पण गडी होता 'रंगेल.'

पुढे नोकरी लागल्यावर जिद्द लागली की आपले एखादे पुस्तक छापून प्रसिद्ध करावे. त्यावेळी प्रकाशक, संपादक, मुद्रक वगैरे शब्द अपरिचित होते. शब्द वाचनात असले तरी त्यांचे कार्यक्षेत्र काय असेल याच्या स्पष्ट कल्पना नव्हत्या. त्यावेळी पुण्या–मुंबईकडील वृत्तपत्रे–मासिके (आणि पुस्तकेसुद्धा) इकडल्या भागात फार कमी प्रमाणात येत. टिळकांचा 'केसरी' व ओगल्यांचा 'महाराष्ट्र' ही दोन वृत्तपत्रे व मोठ्या आकारात निघत असलेले 'चित्रमयजगत्' हे मासिक वाचनात येई तेवढीच आठवण; त्या वयात स्वतंत्र पुस्तके वाचनात आल्याचे स्मरत नाही. याला कारण वनविभागातील नोकरी; जनसंपर्क फार कमी प्रमाणात व खेड्यापाड्यांतूनच विशेष वास्तव्य. उच्च वर्गातील वडीलधारी मंडळी चक्क दुसऱ्याच्या हातात 'महाराष्ट्र' असून "हं कसं काय अण्णा, काय म्हणतो हा केसरी" असं म्हणायचे; व त्यांच्या त्या अज्ञानाचे कुणालाच काही वाटेना. कारण श्रोतेगणही तितक्याच विद्वत्तेचे. मला तर त्या वयात केसरीची भाषा कधीच कळली नाही. जाड टाईपातला मजकूर वाचायचा; 'चित्रमय-जगत्'चा अंतर्विभाग मी यथार्थनेच वाचीत असे. लघुकथा, स्फुट विचार, संपादकीय या शब्दांचे अर्थ व त्याचे कार्य काय हे मला त्यावेळी कळलेले नाही! 'अंत्यसंस्कार' नेहमी शेवटच्या पानावर यायचे, त्यावरून शेवटी देतात ते 'अंत्यसंस्कार' हा सरळ अर्थ मी कित्येक वर्षे मनात वाळगून होतो. 'महाराष्ट्रा'-तील वृत्तविभाग आवडीने वाची, तसेच साहित्यसमालोचनाचे सदर. (ते श्री. माडखोलकर चालवीत असत हे पुढे कित्येक वर्षांनी कळले.) ह्या सदरात कोणती नवनवी पुस्तके प्रसिद्ध झालीत हे कळून येई व संदर्भाने त्या पुस्तकात काय आहे याची कल्पना येई. आणि यामुळेच आपलेही एखादे छोटेसे पुस्तक प्रसिद्ध व्हावे व त्याच्यावर याच महाराष्ट्रातून अभिप्राय आलेला आपण वाचावा या महत्त्वा-कांक्षेनुसार (टिच्चून दोन महिन्यांचा पगार खर्च करून) 'रड्या रंगेल' छाप-विले व प्रसिद्ध केले. एक प्रत सर्वप्रथम 'महाराष्ट्रा'कडे पाठविली; व पुढल्याच आठवड्यात जेव्हा त्यावर 'अभिप्राय' छापून आला त्यावेळचा आनंद काय वर्णावा!

येथे 'अंतरीची व्यथा' कुणाला सांगू किंवा नको असे मला झाले आहे. मित्रांनो, (संत तुकडोजी महाराज) खरं सांगतो पाचशे प्रतीपैकी या पुस्तकाच्या पाचही प्रती (किंमत ३ आणे) विकल्या गेल्या नाहीत. जवळ जवळ दहा वर्षे पुढे मी पुस्तकाच्या प्रती (वारंवार होणाऱ्या बदलीतही) सांभाळल्या. एक संपूर्ण कपाटच त्याला लागे; शेवटी आमच्या सौ. ला एक दिवस चीड येऊन तिने त्या सर्व प्रती काही रुपये काही आण्यात वाण्याला विकून टाकल्या. त्या

रात्रीच एक लेख लिहून काढला. त्याचं नाव होतं 'बुद्धी आणि रद्दी.' पुढं तो 'शांताराम' (प्रा. के. ज. पुरोहित) यांनी मुंबईच्या कोणत्या तरी 'मॅगेझिन' मधून प्रसिद्ध केला.

'रडचा रंगेल' नंतरचे दुसरं पुस्तक 'भक्तिगीत.' बालवाङ्मयातून भक्ति-मार्गाकडे जाण्याला कारणही तसंच घडलं. अगोदरच खेड्यातील वास्तव्य आणि त्यात वनविभागाची नोकरी. त्यावेळी मिळालेले बदलीचे गाव म्हणजे गहन अरण्यातील एक मोठे तळे आणि वन–कर्मचाऱ्यांची चारच घरे. घराचा कंपौंड ओलांडला की अरण्य सुरू. आमच्या त्या कँपमधील एकदोन प्रौढ वनरक्षक भजनाचे मोठे शौकी. सोमवार, गुरुवार, शुक्रवार (आणि पुढे पुढे तर रविवार-खेरीज करून) सर्वच दिवस ह्या भक्तजनाची रात्रौ बारा बारा वाजेपर्यंत भजनी मैफल झडे. मलासुद्धा त्यापरते अन्य साहित्य नव्हते. बाहेर काही निराळं जग आहे हे अगदीच विसरून गेलो होतो आणि त्याची थोडी फार आठवण फक्त तेथे येणाऱ्या आठवड्यातील दोन दिवशी डाकेच्या वेळी होई. वरील भजनास त्या कँपच्या परिसरातील पाच पाच मैलांहून भजनमंडळी मोठ्या हौसेने आपली ढोलकी, वाद्ये, टाळ वगैरे घेऊन येत.

आजच्यासारखा तेव्हा 'चहा' वगैरे नव्हता पण प्रसाद भरपूर. अशा वेळी 'जोशीसाहेब तुम्ही एखादं भजन म्हणा' हे ऐकण्याची जेव्हा पाळी येई तेव्हा माझी मोठी कुचंबणा होई. एकतर मला 'भजन' हा प्रकार नवा; आणि त्यातही तो त्यांचा ग्रामीण तालसूर; शिवाय कसलीच पदे किंवा अभंग तोंडपाठ नाही. अशा स्थितीत शंकर, अंबामाई, दत्त, गणेश, विठ्ठलरखमाई आदी दैवतांची गाणी तयार करून मी म्हणत असे. पुढे त्याचाच संग्रह तयार करून 'भक्तिगीत' छापले गेले. या वर्ष दीडाच्या काळात काय साहित्यनिर्मिती झाली हे सुद्धा कळले नाही; किंवा कसलीच वृत्तपत्रे वाचनात आली नाहीत.

सुमारे १९२९ साली मूल (जि. चांदा) येथे बदली झाली. येथे शाळा, पोष्ट, दवाखाना वगैरे असल्यामुळे काही निराळ्या जगात आल्यासारखे वाटले आणि सुदैवाने पूर्ण पाच वर्षे येथे राहावयाला मिळाले. शाळेत एडेड लायब्ररी होती; वृत्तपत्रेहि येत आणि ग्रंथसंग्रहही त्या काळच्या मानाने बऱ्यापैकी होता. समानशील ग्रंथपाल लाभल्याने आम्हा दोघांची लवकरच गट्टी जमली आणि खऱ्या अर्थाने माझा याच वर्षी साहित्याचा 'श्रीगणेशा' सुरू झाला.

प्रथम मी मुलांकरिता छोटे छोटे लेख व गोष्टी लिहावयास लागलो आणि काही विविध विषयांवरील लिखाणही प्रसिद्ध केले. विशेष ओढा ललित वाङ्-मयाकडे, गद्य आणि पद्य दोन्हीहि. त्यातच १९३० साली हैद्राबाद (द०) येथे कै. डॉ. केतकर यांच्या अध्यक्षतेखाली जे मराठी साहित्य संमेलन भरले; व ते

मी प्रत्यक्ष हजर राहून पाहिले, तेव्हा कुठे वाह्य जगातील आपले मराठी साहित्य कसे काय आहे व सध्या ते कुठल्या वाटेने जात आहे यात्री थोडी फार कल्पना आली.

मूल येथील पाच वर्षांच्या काळात तत्कालीन साहित्याच्या वहुतेक सर्व प्रकारांवर लिहिण्याचा प्रयत्न केला आणि मडगावच्या (गोव्याचा) 'सुवोधा' पासून ग्वाल्हेरच्या 'हितचिंतका' पर्यंत ('माझे लेख' मधील वि. स. खांडेकर यांचा अभिप्राय) वहुतेक नियतकालिकांतून माझे साहित्य प्रसिद्ध झाले. त्यावेळी वडोद्यास असलेले राजरत्न वा. वि. जोशी (आता कै.) आणि माझ्या नावाची इतकी काही गल्लत होई की 'तो मी नव्हे' असे सांगताना आम्हा दोघांनाहि पुरेवाट होई. वडोद्यास रा. सा. ना. गो. चापेकर यांचे अध्यक्षतेखाली जे साहित्य संमेलन झाले त्यावेळी मी विनोदपंडित श्री. (कै.) चिं. वि. जोशी यांचेकडे उतरलो होतो. तेथे वा. वि. जोशी जेव्हा मला 'पाहायला' आले; तेव्हा चिं. वि. जोशी त्यांना मिस्कीलपणे म्हणाले, 'पाहाता काय?' आज आपणा दोघांचे बाप आले आहेत येथे, (कारण दोघाच्याही वडिलाचे नाव 'विनायक'च होते.) पण वयाने आणि शरीरयष्टीने 'मूल' आहेत एवढेच, आणि खूपच हशा उडाला.

याच काळात माझ्या ज्या कथा, निवंध, चर्चात्मक लेख, काव्य, विनोदी गोष्टी प्रसिद्ध झाल्या; त्यांचे पुढे पुस्तकात (लहान–मोठ्या) रूपांतर झाले; वननिवासामुळे शिकारकथांना चांगला वाव मिळाला व वहुतेक लिखाण महाराष्ट्रातील अग्रगण्य व विशेषांक निघालेल्या मासिकात प्रसिद्ध झाले.

लोकसाहित्याची तोंडओळख उपरिनिर्दिष्ट 'यशवन्त' विशेषांकातून प्रथम झाली; आणि तसले वाङ्मय आपल्या परिसरात (ग्रामीण जनतेतून) प्राप्त होण्यासारखे आहे, या दृष्टीने तिकडे वळलो. प्रथम खूपच अडचणी आल्या. मध्यमवर्गीय पांढरपेशा आणि अर्धसाहेवी थाटाच्या माणसापुढे ग्रामीण विभागांतील प्रौढ स्त्रियाच काय पण छोटी मुलेमुलीसुद्धा उभी राहावयास वचकत व माणसे संकोच करीत. त्यांना खुलविण्यास वरेच प्रयत्न करावे लागले. त्यातहि त्यांची निवेदनपद्धती अत्यंत पाल्हाळिक; अशुद्ध शब्द सुटलेल्या धडचासारखी व अपुरी. पण एकंदर 'गाभा' लक्षात आला म्हणजे पुढे पुढे तितका त्रास होत नसे. काही तेलगु भाषेतील कथावाङ्मय दुभाष्याकडून समजावून घ्यावे लागले. माझा पहिला संग्रह प्रो. वनहट्टींनी सुविचार प्रकाशन मालेचे 'प्रथम पुष्प' म्हणून तो इ. स. १९३६ मध्ये प्रसिद्ध केला. मराठी साहित्य परिषदेचे त्यावेळचे चिटणीस प्रा. दे. द. वाडेकर यांच्या वतीने रा. सा. ना. गो. चापेकर यांची या पुस्तकाला प्रस्तावना लाभली. प्रस्तुत वाङ्मय तत्पूर्वी क्रमशः प्रसिद्ध करावयास प्रामुख्याने 'सकाळ' (पुणे)चे वरेच सहकार्य लाभले व विदर्भात या लोकसाहित्याची सर्वप्रथम अशा रीतीने 'मुहूर्तमेढ' रोविली गेली, असे त्यावेळी

बोलले गेले. 'महाराष्ट्रा'तील माडखोलकरांचा अभिप्रायही अत्यंत मार्मिक व सूचक असा ठरला.

ओघानेच आले म्हणून येथे श्री. माडखोलकरांच्या व माझ्या ऋणानुबंधाविषयी दोन शब्द लिहिल्यास अप्रस्तुत होणार नाही. 'माझे लेख' या पुस्तकातील माझे बरेच लेख महाराष्ट्रातून प्रसिद्ध झाले; आणि ते गाजले याला कारण माझी व माडखोलकरांची त्यावेळी व्यक्तिगत ओळख नसताही त्यांनी माझ्या लिखाणावर बरेचसे संस्कार अत्यंत आपुलकीने घडविले. त्याचप्रमाणे पुण्या–मुंबईकडे प्रा. ना. सी. फडके आणि वि. स. खांडेकर यांचेही पाठबळ लाभले. शिरोभागी कै. न. चिं. केळकर व प्रा. द. वा. पोतदार होते. किर्लोस्कर मासिकाचे संपादक शं. वा. किर्लोस्कर यांच्या मासिकातहि त्यावेळी मी लिहीत असल्याने त्यांचाही मोठाच आधार व सहानुभूती लाभली आणि आज आम्ही दोघेही 'आधुनिक वानप्रस्थाश्रम' उपभोगीत असून ती मैत्री कायम आहे. विदर्भातील साहित्यिकात प्रा. वा. कृ. चोरघडे (सध्याचे वि. सा. संघाचे अध्यक्ष), डॉ. वि. भि. कोलते, सुप्रसिद्ध कवि श्री. भ. श्री. पंडित, डॉ. शं. दा. पेंडसे, महाराष्ट्राचे संपादक श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. ना. रा. शेंडे आदि मंडळींशी अत्यंत आपुलकीचे स्नेहसंबंध आहेत.

या सर्वापोटी 'साहित्यातील आत्मानंद' हेच माझ्या जीवितातील सारसर्वस्व आहे.

अल्पस्वल्प का होईना पण इंग्रजी व हिंदीतूनही मी थोडे लिखाण केलेले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील 'ताडोबा राष्ट्रीय उद्याना'ची माझी इंग्रजी पुस्तिका महाराष्ट्र राज्यसरकारने (प्रसिद्धी विभागातर्फे) प्रसिद्ध केली आहे. 'गोंडवनस्थलेतिहासदर्शन' हे पुस्तक माननीय मा. सा. कन्नमवारांच्या इच्छेनुसार त्यांच्या हयातीतच प्रसिद्ध व्हावयाचे होते. पण ते प्रकाशकाभावी तसेच राहून गेले. त्याबरोबरच लोकवाङ्मयावरील लेख, कथा आणि गाणी अजूनही संकलित स्थितीत पडली आहेत. इकडे प्रकाशकवर्ग फार कमी; व पुण्या–मुंबईकडील प्रकाशकवर्गाचा आपल्या इकडील लेखकांविषयी (काही अपवाद सोडल्यास) पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा; कित्येक प्रकाशक या धंद्यात इतके 'मुरब्बी' आहेत की 'व्यवहार' करूनही दोन दोन तीन तीन वर्षे दाद देत नाहीत आणि शेवटी रजिस्टर्ड नोटीस–कोर्ट वगैरेपर्यंत भानगडी निर्माण होऊन 'साहित्य' परत मागावे लागते. निदान माझा या बाबतीत तर इतका कटु अनुभव आहे की त्याकरिता एखाद्या निराळ्या लेखानेच तो चव्हाटयावर आणता येईल.

नोकरीत असताना अधिकारीवर्गाच्या हाताखाली हे साहित्यनिर्मितीचे कार्य पार पाडताना अत्यंत विकट प्रसंगाशी तोंड द्यावे लागले. इंग्रजी कवितांच्या

अनुक्रमणिका

(गंमत म्हणून) अंगिकारलेल्या नादामुळे एका अधिकाऱ्याने वरिष्ठाधिकाऱ्याच्या वड्या दिवसाच्या (Xmas Holidays) स्वागताकरिता एका रात्रीत मला बसवून कविता करवून घेतली; तर आपल्या सुकन्येला शब्द सुचेना व लोकसत्तेतील शब्दकोडे सुटेना म्हणून दुसऱ्या एका अधिकाऱ्याने तिला मजकडे पिटाळले आणि त्यात अपयश आले तेव्हा काय झाले हे न सांगितलेच बरे! अशा काही कडुगोड प्रसंगाशी तोंड देत देत 'आरामात आरामात' वाट चालत येथवर मी आलो आहे. लिहावसं वाटलं तेव्हाच लिहिलं. क्वचित अपवाद सोडले तर कुणाच्या आग्रहास्तव लिहिलं नाही; आणि मी लिहिलं तितकं कुठं ना कुठं प्रसिद्ध झालं; इतकंहि झालं तरी मी जेव्हा प्रामाणिकपणे माझ्यामधील 'वि. वा. जोशी' याला विचारतो की 'बाबा, तू गेल्या तीस पस्तीस वर्षात जी काही साहित्यसेवा केलीस त्यावरून तुझे साहित्यक्षेत्रातील आजचे स्थान कोणते?' (Where am I to place you ?) याला मात्र मजजवळ काहीच उत्तर नाही. अंतःकरणाच्या कुठल्यातरी कोपऱ्यातून उठलेला एक अस्पष्ट अंतर्नाद मात्र (कदाचित तो उपहासात्मकही असू शकेल) कानी पडतो—

Jack of All, Master of None.

शबरीची बोरे

आज भारत चोहीबाजूंनी प्राणांतिक संकटांनी वेढला गेलेला आहे. ह्या संकटग्रस्त परिस्थितीला टक्कर देण्याच्या निर्धाराने भारत केवळ स्व–संरक्षणासाठी, शस्त्र घेऊन पुढे सरसावला आहे. अशा आणीबाणीच्या प्रसंगी संयुक्त राष्ट्र–संघाने 'रामाय स्वस्ति, रावणाय स्वस्ति' असे विचित्र धोरण अंगिकारून भारताला शस्त्र खाली ठेवण्याचा उपदेश सुरू केलेला आहे.

हुबेहूब अशाच काहीशा विचित्र परिस्थितीत बुद्धकालात शाक्यांचे राष्ट्र सापडले होते अशी कल्पना करून स्वातंत्र्य–वीर सावरकरांनी आपल्या "संन्यस्त खड्ग" ह्या नाटकाची उभारणी केली आहे. शाक्यांचे राष्ट्र हतबल आणि निर्वीर्य होऊन पडलेले आहे; त्यांचा धुरंधर पराक्रमी सेनापती विक्रम आपले खड्ग खाली ठेवून, बुद्धानुशासनाने संन्यस्त वृत्ति धारण करून बुद्धाच्या मठात बसलेला आहे; आणि अशातच शाक्यांच्या राष्ट्रावर आततायी आक्रमकांनी भीषण हल्ले चढविण्यास सुरुवात केलेली आहे. शाक्य राष्ट्राची व अगतिक बनलेल्या निरपराध प्रजाजनांची ससेहोलपट सुरू आहे. शाक्यांनी सेनापती विक्रमाला हाती तलवार घेऊन स्वजनांचे संरक्षण करण्यास हाक घातलेली आहे. अशा वेळी विक्रमाने काय केले ?

त्याने जे केले तेच आजच्या परिस्थितीत भारतालाही करणे प्राप्त आहे. का व कसे ते पहाः—

बुद्धः—तरी काय ! आज शाक्यावर विद्युद्गर्भ जय मिळवीत आहे. उद्या शाक्य त्याच्यावर जय मिळवतील. तरी काय ! जयानं ते वैर तसंच पुढे चालणार ! जो पराजित होईल तो दुःखीच राहणार !—म्हणूनच, जो खरा संन्यस्तकाम आहे, खरा उपसन्त आहे, शांत आहे, तो ह्या जयापजयाच्या दोन्ही गोष्टी सोडून स्वस्थ झोप घेतो—

> जयो वैरं प्रसवति दुःखं शेते पराजितः ।
> उपसन्तः सुखं शेते हित्वा जयपराजयम् ॥

विक्रम :—हाय, हाय ! हे मी काय ऐकत आहे. भगवान्, आपल्या स्वतःला जेव्हा वाटलं की आपण निर्वाणपदी पोचलात त्यावेळीहि केवळ ह्या दुःखतप्त जगाला पाहून आपणास आलेल्या कळवळयामुळे लोककल्याणार्थ आपण हा देह चालविलात, तो काय ह्या वचनाच्या आधारे ? केवळ सुखं शेते,–सुखाने झोपतो इतकाच संन्यासाचा मुख्य गुण ? तर मग आपण निर्वाणपदी केव्हाच झोपा काढायच्या होत्यात, देहत्याग करायचा होता. सुखं शेते ह्याचा लाक्षणिक अर्थ आपणास

अभिप्रेत असेल, तर मग ती स्थितप्रज्ञता, कर्म–फलाचा अंतस्त्याग, शस्त्र–संन्यासा-प्रमाणे शस्त्र–धारणातहि शक्य आहे. काटा काढायला संन्यासी सुई घेतोच की नाही ? मग खल–कंटक काढायला खड्ग का घेऊ नये ?.....आपण म्हणता, जय वैरास प्रसवतो आणि पराजित अन्यायी दुःखी होतो. ते काही अंशी खरं आहे. पण अन्यायी मनुष्यास पराजयाचं जे दुःख होतं ते टाळण्यासाठी न्यायाचा पराजय करून घ्यायचा का ? चोरास चोरी फसल्याचं दुःख होऊ नये म्हणून सावांना घरची दारं उघडी टाकण्यास भाग पाडायचं ? का ते पराजयाचं दुःख अन्याय कर्माची शिक्षा म्हणून त्या दुष्टास भोगणं प्राप्त होणंच श्रेयस्कर मानायचं ? अन्यायी आततायास पराजयाचं दुःख होतं ते वाईटच; पण जर दुर्जनांचा उद्दंड अन्याय तसाच चालू दिला, तर निरपराध सुजनांच्या छळानं अवघी मनुष्य जात संत्रस्त आणि दुःखी होते त्याची वाट काय ?..... परदुःख हे केव्हाहि परकल्याणाचं मूळ असतं... .अपराध्याचं दुःख टाळणं म्हणजे लाखो निरपराधी लोकांस दुःखी ठेवणं होतं. हाच न्याय संन्याशाच्या शस्त्र–धारणास का लागू नये ? ज्या राष्ट्राचं अन्न खाऊन हा पिंड प्रतिदिन पोसला जात आहे त्या राष्ट्रावर एक अत्यंत उद्दंड राक्षस सहस्रावधी सैनिकांनिशी चालून आला आहे. अशा वेळी तरवारीच्या एका झटक्यासरशी तो राक्षस मारणं शक्य आहे असं वाटत असूनहि जो संन्यासी आपली झोप बिघडू नये म्हणून खड्ग सावरण्याचे सोडून आपलं पांघरूण सावरू पाहतो, आपल्या राष्ट्रातील लाखो स्त्री–बाल–वृद्ध भोसकले जात असताना त्यांच्या कर्कश किंकाळ्यांनी आपली झोप मोडू नये म्हणून आपल्या कानात निरर्थक आणि अनर्थक प्रतिज्ञांचे बोळे घालून ' सुखं शेते '—सुखाने घोरत पडतो त्या संन्याशाला शतवार धिक्कार असो ! सहस्रवार धिक्कार असो ! सुखं शेते ! केवळ स्वस्थ घोरत पडणं हे का उपसन्ताचं ध्येय आहे ? संन्याशाचं ध्येय आहे ? ते अजगराचं असू शकेल, आळशाचं असू शकेल, आप्पलपोटयाचं असू शकेल !— संन्याशाचं नव्हे !—तेव्हा भगवान्, मला आज्ञा द्यावी ! म्हणा;—विलंब न करता म्हणा, ' जा ', आणि मी गरुडासारखी झेप घेऊन त्या अत्युग्र भुजंगाचे शाक्यांच्या प्राणास पडलेले भयंकर विळखे तोडून फोडून विच्छिन्न करून टाकतो पहा !—म्हणा ' जा. '

वृद्धः—भिक्षुवर विक्रम, आपल्यासारख्या तत्त्वज्ञानी संन्यस्त भिक्षूने असे एकाएकी उत्तेजित होऊन उठावे हे आश्चर्य आहे. काही झाले तरी मला तुम्हाला शस्त्रयुद्धात शस्त्र घेऊन ' जा, लढा ' असे सांगणे शक्य नाही ! संघाची आणि संन्यासाची मूल भित्तीच ज्या काही प्रतिज्ञांवर अवलंबून आहे त्यातील आत्यंतिक शस्त्र–संन्यासाची ही शपथ कोणाहि भिक्षूला मी मोडू देणार नाही.

विक्रम :—दुर्दैव त्या राष्ट्राचं की ज्यात हा दुबळा संन्यासधर्मच सर्वोच्च धर्म समजला जातो. दुसरं काय ? शाक्य दूतहो, जा, आणि राजसभेला सांगा की

अदूरदर्शीपणाने आत्यंतिक शस्त्रन्यासाची प्रतिज्ञा करणे ही चूक झाली. म्हणून, त्यामुळे लोककल्याणास अत्यंत हानी पोचत आहे असे स्पष्ट दिसत असूनहि ती चूक--स्वतःच्या दृढ निश्चयानेच स्तोम माजविण्यासाठी नाकारणे हा दृढनिश्चय नसून दुराग्रह आहे असे, विक्रमसिंहास वाटत असूनहि, बुद्ध भगवंताची अनुज्ञा नसल्यामुळे त्याची स्थिती एखाद्या मंत्र-बद्ध नागासारखी झाली आहे. शाक्यांच्या रक्षणार्थ खड्ग निष्कोषित करून समरात घिरण्यास उद्युक्त असताहि तुमच्या सहाय्यार्थ मला येता येत---

राजदूत---हां, हां ! ते अशुभ वाक्य, तो निर्दय निर्णय, ती राष्ट्रघातक अर्थव्यक्ति पुरी करण्याचे आधी एक पळभर तरी थांबा. बुद्धदेवाच्या इच्छेचा शेवटचा शब्द आपण एक श्रवणाने ऐकलात. पण त्याचे बरोबरच ह्या आर्त, त्रस्त, मरणोन्मुख शाक्य राष्ट्राचाहि शेवटचा शब्द दुसऱ्या श्रवणाने ऐका, आणि मग तुमच्या ह्या निर्णायक वाक्याचा शेवटचा शब्द बोला. शाक्य राष्ट्राच्या आत्म्याची ह्या भयानक संकटातील तळमळ, जिवाची तगमग, त्याच्या शेवटच्या आशेचा तो शेवटचा शब्द व्यक्तविण्याचे सामर्थ्य कोणाहि एका व्यक्तीच्या जिव्हेत असणे शक्य नसल्याने शाक्य जातीची ही जातीय जिव्हाच आपल्यापुढे ती राष्ट्रीय करुणा भाकील !

(विक्रमसिंहाचे खड्ग काढून त्याच्यापुढे ठेवतो.)

विक्रम :– (दचकून) काय ?—हे माझे खड्ग ! हे माझं कृपाण ! चाळीस वर्षे होतील मी संन्यास घेतला तेव्हा हे मी खाली ठेवले !--ह्या खड्गाने मी बारा वेळा शाक्यांच्या शत्रूला धूळ चारली आहे !

राजदूत :---सेनापती, त्याच्या मुष्टीवर त्या बारा विजयांचे स्मारक म्हणून बारा रत्नांचा जडाव चढवून हे आपले खड्ग आमची राष्ट्रीय मत्ता म्हणून आमच्या राजसभेत आम्ही शाक्य सदा लटकत ठेवीत असतो. प्रत्येक नवा सेनापती ज्या खड्गाला नमन करून आपले पद स्वीकारतो. ते हे खड्ग ! शाक्यांनी ह्या खड्गास आमचा प्रतिनिधी म्हणून आपणास आमचा संदेश देण्यास, आमची प्रार्थना ऐकविण्यासाठी आणि मन वळविण्यासाठी धाडलेला आहे ! शाक्य राष्ट्र जर आता मरणेच असेल, तर निदान वीरोचित प्रतिकार करीत तरी मरावे,--- पण तेहि आता आपण हा खड्ग उचलून रणात अगदी त्वरित उतराल तरच शक्य ! महाराज, क्षणभर मी जो प्रकार पाहात आलो तो डोळ्यासमोर आणा ! ती आमापल्ली, केदनावती, लींवणीय कोसलच्या सैन्यांनी लावलेल्या आगीत गावेची गावे भडकत आहेत पहा ! कडाकड मोडून पडणाऱ्या पेटलेल्या वहालांच्या आणि छप्परांच्या खाली म्हातारे आणि मुले जिवंत दबून जळून जात आहेत ते पहा ! त्यांच्या मांसाचा तो उग्र वास कोस-कोस पसरत आहे ! मारा, हाणा,

करीत कोसलचे शेकडो सैनिक नागवी तलवार घेऊन भेटेल त्या शाक्याला सपासप कापीत, लुटीत, ठेचीत धावत आहेत ते पहा ! त्या स्त्रियांच्या थव्यावर घोडे घातले पहा ! ती मुले टिचून गेली पहा ! त्या रक्ताच्या चिळकांड्या, ती मुंडकी, त्या किंचाळ्या, तो पळ, तो कण्ह ! – महाराज, शाक्य राष्ट्र आपले मूल आहे. हा कसाई विद्युद्गर्भ आणि त्याचा दुष्ट सेनानी चंड सुरा घेऊन त्याचे पाठीवर येत आहे ! ते रडते भ्यालेले लेकरू आपल्या कमरेस बिलगत आहे ! आपण दया करा – वाचवा !

विक्रमः––वाचवतो ! ज्या शाक्य संन्याशाला राष्ट्राची इतकी दुर्दशा चालली असताना सुखाने झोप लागते त्याला लागो ! मला तर ती लागत नाही !––भगवान, ऐकलंत, ना सारं ? मग उचलू ना हे खड्ग ?

बुद्धः––संन्यासधर्माच्या, भिक्षुधर्माच्या हे सर्वस्वी विरुद्ध आहे ! याहून मी काहीच सांगू इच्छित नाही.

विक्रमः––तर मग तुम्ही न सांगता मी अशा या दुबळ्या, जातिघातक, मनुष्यहितविरोधक संन्यासधर्माचाच हा संन्यास केला पाहा ! हे कर्तव्याचं कृपाण उचललं पहा ! माझ्या शाक्य राष्ट्रा, हे मंत्रस्त मनुष्यमात्रहो, राष्ट्रधर्मास्तव, मनुष्यधर्मास्तव, भूतदयेस्तव, अपरिहार्य साधन म्हणून हा संन्यासी हे शस्त्र उचलीत आहे पहा ! हे शस्त्र मी अशा परिस्थितीत उचलीत आहे की त्यायोगे विद्युद्गर्भाच्या क्रौर्यास पराजित नसले तरी पंगू करून टाकून सहस्रावधी जीवांस मी वाचवू शकणार आहे. गेल्या चाळीस वर्षांच्या शस्त्रन्यासाने मी जितक्या साधूंचे परित्राण आणि जीवांची दुःखापासून सुटका करू शकलो नाही तितकं लोककल्याण या शस्त्रधारणाने मी येत्या चाळीस दिवसात करू शकेन ! जातो मी ! क्षणाक्षणाचा उशीर शाक्यांना मरणाच्या फाशात अधिकाधिक गुंतवीत आहे. तरीही, हे चराचर हो ! तुम्हीच साक्ष आहात की मी लोकहितास प्रसंगी प्रतिकूल जाणाऱ्या प्रतिज्ञांनी पंगू असलेल्या या संन्यासाश्रमास सोडून जात आहे; ज्या आत्यंतिक अहिंसेमुळे दुष्टांचे परित्राण आणि साधूंचा विनाश होतो, ती अहिंसा धर्म नसून प्रत्यक्ष अधर्मच असल्यामुळे मी तिला सोडून जात आहे, भगवान बुद्धदेवास नव्हे !–– (खड्ग उचलून जातो.)

अलंकार–काही विचार

दिलीपसिंह बैस, एम. ए.

रस हा काव्याचा आत्मा. त्याच्या पिष्टपेपणामुळे रसचर्चेचे वैय्यर्थ सिद्ध करण्यापर्यंत जशी पाळी आली, तशा प्रकारची परिस्थिती मराठी अलंकारांबद्दल निर्माण झाली नाही, हे अलंकारांचे अहोभाग्य म्हणायला हवे. संस्कृत ग्रंथातील अलंकारविवेचनातील शून्यशोधनाचा शोध घेतल्यामुळे, संस्कृतशास्त्रज्ञांनी अलंकारांची जी अबाढव्य संख्या वाढविली, तिचा संकोच करण्याची मराठी विद्वानांची प्रवृत्ती झालेली आहे. दुसरी गोष्ट अलंकारांचे काव्यसापेक्ष महत्त्व त्यांनी निरंतर आपल्या दृष्टीसमोर ठेवलेले आहे. वाङ्मयात ज्याचा वापर होत नाही किंवा पूर्वी झालेला नाही त्यांना अलंकारशास्त्राच्या दाराबाहेरच ठेवले आणि जुन्याचा यथावरहुकूम मान राखूनही नवीन अलंकारांची घडण काही सूक्ष्म दृष्टीच्या कारागिरांनी केलेली आहे.

संस्कृतशास्त्रज्ञांनी अलंकारांविषयी जो सावत्र भाव दाखविलेला आहे तो वहुतेक कुणालाच सम्मत नाही. काव्य आणि अलंकार हे शब्दब्रह्माचे अपत्य असता, अलंकारांना मात्र धातुमय करून टाकून कमी किमतीचे म्हणून लेखले. हे त्यांना अयोग्य वाटले. संस्कृत साहित्यशास्त्रातील ही विसंगती श्री. रा. श्री. जोग यांना जाणवली. त्यांनी अलंकाराचे रूपांतर 'विभ्रमा'त करून अलंकार शरीरबाह्य होत असा जो समज होता तो काढून टाकला.

अलंकारांचे स्थान दुय्यम मानून तरी त्यांचीच अधिक चर्चा, काव्यशास्त्राला अलंकारशास्त्र म्हणण्याची प्रथा, काव्यात अलंकारांना स्थान नसल्याचा निर्वाळा देऊन, प्रत्येक श्लोकात अलंकारसंशोधन; ही संस्कृत साहित्यशास्त्राची भूमिका त्यांना दुटप्पी वाटते. या विसंगतीचे मुख्य कारण अलंकार या शब्दाची योजना असे म्हणून पुढे ते लिहितात, "ज्यांनी काव्यशरीर घडते, त्यांनीच काव्यअलंकारही घडलेले असतात. व्यवहारात असे होत नाही. मानवशरीर रक्तामांसाचे व दागिने सोन्याचांदीचे असतात, म्हणजे त्यांची उपादान कारणे भिन्न भिन्न आहेत. काव्यात तसे नाही. काव्यशरीर व अलंकारशरीर शब्दार्थांचेच असतात. तेव्हा काव्यालंकारास व्यवहारातील अलंकाराचा दृष्टांत देण्यात चूक होते हे उघड आहे. ती चूक टाळण्याकरिता काव्यालंकारास काव्यविभ्रम म्हणणे युक्त ठरेल." [काव्यविभ्रम, पृ. २] जोगांचे हे मत युक्त ठरत नाही. श्री. द. के. केळकरांनी अलंकारांचा संख्यासंकोच आणि नामकरण यांचा गौरव करून अलंकाराचे नाव

पूर्वी स्पष्टार्थबोधक नसल्याचे सांगून, "तेव्हा नावे अर्थबोधक होण्यास व त्यामुळे ती लक्षात राहण्यास सोपे जावे म्हणून काही अलंकारांची नावेही त्यांनी नवीन ठेवली किंवा बदलली आहेत." [अभिनव काव्यप्रकाश, पृ. २४५] असे म्हणणाऱ्या जोगांनीच 'अलंकार' हे सोपे व बहुरूढ नाव त्यागून त्यांना 'विभ्रम' म्हणावे हे आश्चर्य होय. अलंकार या शब्दाने स्पष्टार्थ बोध न होता जी विसंगती निर्माण होत होती ती टळावी म्हणून त्याचे नाव त्यांनी 'विभ्रम' ठेवले. पण त्या शब्दातूनसुद्धा 'विभ्रम' निर्माण होतो. मूळ भूमिका नासते. या गोष्टीची अचूक जाणीव डॉ. वाळिंबे यांना झालेली आहे. ते म्हणतात, "प्रो. जोगांनी अलंकाराऐवजी 'विभ्रम' हा जो शब्द वापरला आहे तो मला संमत काही. गडबडीमुळे भूषणांच्या स्थानाचा विपर्यय होणे, म्हणजे भलत्याच ठिकाणी अलंकार घालणे असा 'विभ्रम' या शब्दाचा शास्त्रकारांनी अर्थ दिलेला आहे. 'वागङ्गसत्वाभिनयभूषास्थान विपर्यया। त्वरस्या कल्पितोऽभीष्ट दर्शने यः स विभ्रमः ॥' अशी शारदातनयाने 'भावप्रकाश' या ग्रंथात विभ्रमाची व्याख्या दिली आहे. [पृ. ९] म्हणून विभ्रमाऐवजी 'विलास' हा शब्द वापरावा अशी माझी सूचना आहे. विलासाची व्याख्या, 'प्रिय संगमकाले तु नेत्रभ्रूवक्त्रकर्मणाम्। विशेषो यः स विज्ञेयो विलासोऽङ्गक्रियादिषु ॥' [भावप्रकाश पृ. ९]" [साहित्य-मीमांसा पृ. ३१५].

पण या विलासांनासुद्धा 'प्रियसंगमकाले'ची मर्यादा आहे म्हणून विलास म्हणणेहि अयोग्य वाटते. श्री. वाळिंबे यांच्या मताचा विशेष परामर्ष घेण्याआधी श्री. मंगरूळकर आणि अर्जुनवाडकर या सव्यसाची लेखकद्वयांनी श्री. जोगांवर चढविलेल्या चढाईचें स्वरूप पाहणे मनोरंजक ठरेल.

श्री. जोगांच्या 'विभ्रम' या संज्ञेविषयीचा फरक त्यांना चिल्लर वाटतो. शिवाय हा संज्ञेचा बदल नाही असे त्यांना वाटते. ते म्हणतात, "'अलंकार' या शब्दाचा व्यवहारात अर्थ काहीहि असो; काव्यशास्त्रातला त्याचा अर्थ केवळ लक्षणानेच ठरणार. अलंकारांचे काव्यशास्त्रातील लक्षण हे की काव्यात्मभूत रसादि अर्थाला वाच्यार्थाच्या द्वारा जो अनियततेने उपकारक होतो, तो अलंकार." [पहा, पृ. २२४] ह्या लक्षणाने निर्दिष्ट अशी काही वस्तूच काव्यात नसते असे सिद्ध होईपर्यंत 'अलंकार' या परिभाषेला धक्का लागण्याचे काहीच कारण नाही. जोगांच्या आक्षेपाने धक्का पोचतो, तो काव्यातील घटकांचा अंगांगिभाव स्पष्ट करण्या-साठी दिल्या जाणाऱ्या जीवशरीर दृष्टान्ताला पोचतो. या दृष्टान्तात अलंकारांना दाखला 'कटककुंडलादिकां'चा दिला आहे (पृ. ७८). जोगांच्या मते तो 'विभ्रमा'-चा असावयास हवा, 'हारादिवदलंकाराः' असे नको; 'विभ्रमः इव अलंकाराः' असे हवे.' शिवाय हा फरक तात्त्विक दृष्टीने मान्य केला तरी चिल्लर वाटतो. कारण, "शास्त्रात दृष्टान्त हा बोधसौकर्यासाठी येत असतो आणि एकदेशी

अनुक्रमणिका

असतो. त्याची सिद्धान्ताला अडचण येत असेल तर त्याचा त्यागच श्रेयस्कर ठरतो. " [काव्यप्रकाश उपन्यास ०२७०] अशा रीतीनें मूलेकुठार केल्यानंतर, याशिवाय 'विभ्रम' हे नाव स्वीकारण्यातील अडचणी दिल्या त्या अशा : "पण शरीर आणि विभ्रम यांचे तरी उपादानकारण समान कोठे आहे ? विभ्रम काय रक्तामांसाचे घडलेले असतात ? हास्य, विभ्रम, गति इत्यादि गोष्टी म्हणजे संयोगवियोगजन्य अमूर्त धर्म आहेत. ते रक्तामांसाचे समजणे अज्ञानमूलक होय. सर्वच प्रकारचे दागिनेही शरिरापासून सारख्याच सुकरतेने वेगळे काढिता येत नाहीत. . अलंकार काव्यापासून वेगळे काढिता येत नाहीत, हेही म्हणणे पूर्णांशाने खरे नाही. समान वाक्यात गुंतलेले नसतील किंवा परंपरेने—म्हणजे साखळीनें आलेले असतील, तेव्हा अलंकारही . काही मर्यादेपर्यंत काव्यापासून दूर करणे शक्य आहे." [काव्यप्रकाश, ०२७१] असे प्रतिपादन करून 'विभ्रमा'पेक्षा 'अलंकार' ही जुनी संज्ञाच श्रेयस्कर मानली.

काव्यप्रकाशाच्या या उपन्यासकारांना जोगांनी बदललेले नाव अयोग्य व चिल्लर जरी वाटले तरी इतके ते चिल्लर खासच नाही. कारण त्यांची नाव बदलण्यामागची भूमिका पाहिली तर याचा उलगडा सहज होण्यासारखा आहे. 'अलंकार' या शब्दसमूहामुळे जी विसंगती निर्माण झाली ती नष्ट व्हावी हा त्यांचा प्रमुख उद्देश. लक्षण आणि त्या लक्षणानुसार केलेले नामकरण यात जितक्या प्रमाणात अधिक अनुरूपता येईल तितके योग्य. शास्त्रातील अर्थ आणि व्यवहारातील अर्थ यात जर फरक पडत असेल तर तो फरक पडू न देता दोन्ही दृष्टींनी अनुरूप अशी जर शब्दयोजना केली तर विघडले कोठे ? आणि ती जर साधली तर तो मानवी बुद्धीचा उत्कर्षच मानावयाला नको का ? आणि पूर्वजांनी म्हटले म्हणून आपणही तेच योग्य ठरवून नव्याचा निषेध करणे अनिष्ट होय. अलंकाराचे काव्यशास्त्रातील लक्षण हे की, "काव्यात्मभूत रसादि अर्थाला वाच्यार्थाच्या द्वारा जो अनियततेने उपकारक होतो, तो अलंकार." तेव्हा तो 'अलंकार'च का मानावयाचा ? या ठिकाणी दुसरा योग्य शब्द का वापरता येऊ नये ? अलंकाराऐवजी 'विभ्रम' असे का म्हणू नये ? "ह्या लक्षणाने निर्दिष्ट अशी काही वस्तूच काव्यात नसते, असे सिद्ध होईपर्यंत 'अलंकार' या परिभाषेला धक्का लागण्याचे काहीच कारण नाही." या त्यांच्या विधानात उफराटा युक्तिवाद आहे. अगोदर लक्षण सांगून त्याचे नामकरण करावयाचे. हे लक्षण काव्यात नसते हे सिद्ध होईपर्यंत त्या नावाला धक्का पोचत नाही असे म्हणावयाचे. लक्षण तेच असून नाव बदलले जाऊ शकते. ते नाव 'अलंकार' असे न ठेवता 'विभ्रम' किंवा यापेक्षा अनुरूप असे नाव योजता येण्यास हरकत नसावी. "काव्यात्मभूत रसादि अर्थाला वाच्यार्थाच्या द्वारा जो अनियततेने उपकारक होतो, तो विभ्रम" असे आपणास म्हणता यावयाचे नाही का ?

या लेखकद्वयांनी विभ्रमावर जे वादळ उठविले त्याचे कारण पूर्वसूरींचा अभिमान व त्यांच्याच ओंजळीने पाणी पिण्याची वृत्ती हे होय. "नावाच्या बाबतीतली संस्कृत अलंकारिकांची भूमिका अशी आहे की, अलंकाराचे नाव हे त्या अलंकाराच्या घटनेतील कोणते तरी एखादे वैशिष्ट्य दृष्टीपुढे ठेवून दिलेले असते. त्या अलंकाराचे पूर्ण स्वरूप लक्षणाने ठरते. अलंकाराचे समग्र रूप त्याच्या नावावरून कळावे, अशी अपेक्षा बाळगिणे व्यर्थ आहे. अशी अपेक्षा बाळगिल्यास लक्षणवाक्ये हीच अलंकारांची नावे मानावी लागतील." ह्या भूमिकेतून त्यांचा विरोध आहे.

आता ह्या संस्कृतशास्त्रज्ञांची भूमिका गृहीत धरूनही आपणास हा नावे बदलण्याचा हक्क नाही का? अलंकाराच्या घटनेतील कोणते तरी एखादे वैशिष्ट्य दृष्टीपुढे ठेवून नाव दिलेले असले तरी असेच दुसरे एखादे वैशिष्ट्य डोळ्यापुढे ठेवून नामकरण करण्यास प्रत्यवाय असू नये. 'विभ्रम' हे नाव कोणतेही वैशिष्ट्य समोर न ठेवता ठेवले असे त्यांनी कोठेच सिद्ध केलेले नाही.

दुसरी गोष्ट "अलंकारांचे समग्र रूप त्याच्या नावावरून कळावे अशी अपेक्षा बाळगिणे व्यर्थ आहे." हे त्यांचे म्हणणेही युक्तियुक्त नाही. कारण एखाद्या चाणाक्ष बुद्धीच्या माणसाने त्याचे समग्र रूप [घटनेतील कोणते तरी वैशिष्टच नव्हे] कळण्यासारखे नाव ठेवले तर ते स्वीकारणे योग्यच होईल.

'विभ्रम' हे नाव स्वीकारण्यातील अडचणींचा उहापोह केलेला आहे. त्यातील पहिला आक्षेप योग्य वाटतो. काव्य आणि अलंकार यांचे उपादानकारण 'शब्दार्थ' हे समान आहेत. या जोगांच्या म्हणण्यावर यांचे म्हणणे असे की, "पण शरीर आणि विभ्रम यांचे तरी उपादानकारण समान कोठे आहे? विभ्रम काय रक्तामांसाचे घडलेले असतात? हास्य, विभ्रम, गती इत्यादि गोष्टी म्हणजे संयोगवियोगजन्य समजणे अज्ञानमूलक होय" [पृ. ०२७०] हे म्हणणे पटण्यासारखे आहे. "दागिने शरीरापासून वेगळे काढता येतात, पण उपमादि अलंकार काव्याहून पृथक् करता येत नाहीत." या जोगांच्या म्हणण्यावर घेतलेला आक्षेप "दागिनेही सर्वच प्रकारचे शरीरापासून सारख्याच सुकरतेने वेगळे काढिता येत नाहीत. जसे गळ्यातील हार काढणे जितके सहज शक्य आहे तितके हातातले कंगण किंवा कानातले कुंडल काढणे सहज शक्य नाही. अलंकार काव्यापासून वेगळे काढिता येत नाहीत, हेही म्हणणे पूर्णांशाने खरे नाही. समानवाक्यात गुंतलेले नसतील, किंवा परंपरेत—म्हणजे साखळीने—आलेले असतील तेव्हा अलंकारही काही मर्यादेपर्यंत काव्यापासून दूर करणे शक्य आहे." [तेच ०२७१]

जे जोगांनी म्हटलेले नाही ते म्हटल्याचा आभास यांनी निर्माण केलेला आहे. 'दागिने शरीरापासून काढता येतात,' हे जोगांचे मुख्य विधान. मग

सर्व प्रकारचे दागिने, सारख्याच सुकरतेने काढता येतात किंवा काढता येत नाही, हा प्रश्नच उद्भवत नाही. काढता येतात एवढंच. पुढचे वाक्य "अलंकार काव्यापासून वेगळे काढिता येत नाहीत, हेही म्हणणे पूर्णांशाने खरे नाही." हे त्या द्वयांचे मत खरे आहे. पण येथेही भूलच झालेली आहे. हे आपलं म्हणून जे विधान पुढे मांडतात, नेमकं तेच जोगांनी म्हटलेले आहे. "दागिने शरीरापासून वेगळे काढिता येतात. पण उपमादी अलंकार काव्याहून वेगळे काढिता येत नाहीत." या जोगांच्या विधानातील 'उपमादी अलंकार' हे दोन शब्द अत्यंत महत्त्वाचे आहेत. 'उपमादी' हा शब्द न लिहिता केवळ 'अलंकार काव्याहून वेगळे काढिता येत नाहीत' असे जर त्यांनी विधान केले असते तर त्यांचे म्हणणे '**पूर्णांशाने खरे नाही**' हे मत योग्य ठरले असते. तात्पर्य, 'उपमादी' या शब्दाकडे दुर्लक्ष झाले (की केले ?) म्हणून हा घेण्यात आलेला निरर्थक आक्षेप म्हणून व्यर्थ अविक्षेप होय.

अर्थात 'विभ्रम' हे नाव संपूर्ण योग्य आहे असे नव्हे. पण त्यामागील तत्त्व योग्य वाटते इतकेच. अजून कुणी निर्दोष असे नाव सुचविले तरी चालण्यासारखे आहे. पण त्यासाठी वेगळाच प्रयत्न व्हावा. कारण जोगांनी 'विभ्रमा'-ची स्थापना करताना संस्कृतसाहित्यिकांच्या 'दुटप्पी' धोरणाचे धिंडवडे काढले असले तरी संस्कृतशास्त्राने योजिलेल्या काव्यरूपकाच्या मर्यादित चक्रातच त्यांच्या 'विभ्रमा'ची भ्रमंती सुरू असल्याचे पाहून गंमत वाटते.

आता दुसऱ्या मुद्द्याकडे वळणे इष्ट आहे. रस आणि अलंकार यांच्या संकोच-विस्ताराविषयी एक गोष्ट जाणवते. 'रस' नऊ असून त्यांची संख्या उत्तरोत्तर वाढत आलेली आहे. उलट अलंकारांची संख्या 'अवाढव्य' असताना तिच्या संख्येला मर्यादा घालण्याचे प्रयत्न सातत्याने होत आहेत. रसांना निरनिराळ्या कसोट्या लावण्यात येत आहेत. तसेच अलंकारांच्या वर्गीकरणाची नवनवी तत्त्वे मांडली जात आहेत. 'जुने जाउ द्या मरणालागुनी' ही दृष्टी अलंकारांबाबत जितक्या जास्त प्रमाणात आढळते तितक्या प्रमाणात इतर तत्त्वांबद्दल दिसून येत नाही.

अलंकारशास्त्रावरील निर्माण झालेल्या मराठी ग्रंथांची भूमिका पाहिली तरी त्यात अलंकारांच्या संख्येला मर्यादित स्वरूपात स्वीकारण्याची प्रवृत्ती दिसते. परंतु तिचा उत्साहपूर्ण जोम बाळूताई खरे, श्री. द. के. केळकर आणि श्री. धोण्ड यांनीच दाखविला.

खऱ्या अर्थाने खऱ्यांनीच या विचाराला तोंड फोडले. आपल्या साधार विवेचनाचा आधार देऊन आणि संख्येबद्दल चर्चा करून, तो चर्चेचा विषय करून टाकला.

जगन्नाथाला ही अवाढव्य संख्या अनावश्यक वाटली. ग्रीक तत्त्वज्ञ Quinctition यानेही ह्या वाढीबद्दल तीव्र नापसंती दर्शविली. आणि इंग्रजी

अनुक्रमणिका

वाङ्मयाने आपली अलंकारसंख्या 'नियमना'अगोदरच मर्यादित ठेवली. ही दृष्टी बाईंनी सुद्धा स्वीकारली.

वाळूताईंची सशक्त धारणा अशी होती की, तत्त्व आणि व्यवहार यांचा मेळ असल्यास महत्त्वाची कार्ये घडून येतात. अन्यथा दोहोंचे महत्त्व कमी होते. या न्यायाने अलंकारशास्त्र आणि काव्यशास्त्र यांच्यात मेळ बसावयाला पाहिजे, अन्यथा, "अलंकारशास्त्र हे काव्याकडे न पाहता केवळ शास्त्र या दृष्टीने चर्चेस घेतले तर त्याचा काव्याला उपयोग होणेच शक्य नाही. तेच काव्य अगर वाङ्मय पाहून शास्त्र बनविल्यास त्याची खरी योग्यता पटल्याशिवाय राहणार नाही. ज्या तत्त्वाचा व्यवहारात कधीही उपयोग होणार नाही अशा तत्त्वांचे सूक्ष्म विवेचन कुशाग्र बुद्धीने केले तरी ते अव्यवहार्य असल्याने तत्त्वप्रतिपादकाच्या बुद्धीचे फार तर काही काळ कौतुक होईल. पण अशा रीतीने अनाठायी बुद्धी चालविल्याबद्दल जरा विषादच वाटेल." [अलंकारमंजूषा, पृ. ३२२]

ही गोष्ट नेमकी अलंकारशास्त्राबद्दल झाल्यामुळे त्याबद्दल अनास्था उत्पन्न झाली. त्यांचा अवाढव्य पसारा पाहून ते एक अगम्य शास्त्र झाले आहे. त्यात अलंकारांसाठी काव्य निर्माण झालेले आहे. शिवाय अलंकारांच्या काटेकोर व्याख्या करण्याच्या भरात व्याख्या तर पूर्ण केली नाहीच उलट आणखी एक नवीन भेद निर्माण करण्यात आलेला आहे. ह्या भेदातून पुन्हा मतभेद निर्माण होत राहिला. ह्या भेदांच्या शृंखलांनी जखडण्यापेक्षा अलंकारांची व्याख्या अधिक व्यापक केल्यास व "शास्त्र हे सुगम व व्यवहार्य केल्यास त्याचे महत्त्व राहते. उपमेचे, उत्प्रेक्षेचे शेकडो भेद पाडून शास्त्रज्ञांनी पै–पैशाची व्यवस्था पाहण्यासाठी कारकुनी आव आणलेला आहे. त्यामुळे अलंकारशास्त्रासंबंधी अनास्था झालेली आहे." शिवाय हे भेदजाल नष्ट व्हावे यासाठी त्यांच्या मते "अभेदाने जितके अलंकार एकछत्री अमलाखाली आणता येतील तितके आणणे इष्ट आहे." [अलंकारमंजूषा, ३३६] यामुळे अलंकारांतील सौंदर्य नष्ट होण्याची भीती नाही. उलट विविध सौंदर्याचा एका नावात समावेश करावयाचा इतकेच. ह्या विचारसरणीनुसार वाळूताईंनी हा अलंकारांचा फापट पसारा विशिष्ट संस्कारांनी काढून टाकला.

अलंकारांची संख्या मर्यादित का करावी ? यावर त्यांचे म्हणणे, "ज्याचे अस्तित्व भासते व रुचते, ज्यांचा व्यापकपणा व महत्त्व चटकन ध्यानात येते, तेच खरोखर अलंकार. अलंकारांनी वाङ्मयाचे सौंदर्य वाढले पाहिजे, विचारांचे आकलन सुलभ झाले पाहिजे. असे अलंकार भाराभर असण्यापेक्षा मर्यादित असणेच श्रेयस्कर" [पृ. ३२२]. यासाठी अलंकारांनी सांभाळलेले सवतेसुभे त्यांनी भराभर खालसा करून टाकले.

"काव्याचा आत्मा रस; व अलंकार हे काव्याला केवळ शोभा आणणारे अशीच समजूत अलंकारशास्त्राच्या इतिहासात फार प्राचीन काळापासून आहे. रसावाचून काव्य मृत होय. पण अलंकाराशिवाय काव्य सम्म होऊ शकते ही गोष्ट लक्षात घेतल्यास अलंकारांना काहीच किंमत रहात नाही." परंपरेनुसार यांनी-सुद्धा अलंकारांना उपरे ठरवून टाकले. निरलंकृत काव्य असू शकते का ? हा प्रश्न विचारण्यासारखा आहे ? हा फार मोठा वादाचा विषय असून त्यावर स्वतंत्र लेखच लिहावा लागेल. सध्या काव्यातील अलंकारसापेक्षतेपेक्षा त्यांच्या संख्येविषयी विचार करावयाचा आहे.

वाळूताईंची संख्यासंकोचविषयक दृष्टी पुढे सर्व समीक्षकांनी कमी अधिक फरकाने स्वीकारलेली असल्याचे आढळून येते. त्यांच्या भूमिकेवर चौफेर हल्ला करणारे मंगरूळकर आणि अर्जुनवाडकर यांच्या कौशल्याचे कौतुक करून त्यांच्या वैचारिक डावपेचांची ओळख करून घेणे योग्य होईल. खऱ्यांच्या, त्यांना खोटया वाटणाऱ्या विधानांच्या परामर्शात बुद्धीची चुणूक आहे, स्वमत–प्रतिपादनाचे चातुर्य आहे तितकेच दिशाभूल करणारे हस्तलाघवही आहे.

वाळूताईंची भूमिका आपल्या सोईनुसार दिल्यावर ते लिहितात, "खऱ्यांचे हे सर्व म्हणणे खोटे आहे. शास्त्र हे सुगम होईल की दुर्गम होईल, याची चिंता शास्त्रकाराने करण्याचे काहीही कारण नाही. शास्त्र हे शास्त्र होईल की नाही, एवढीच चिंता त्याने वहावयास हवी." पुढे शास्त्राची व्याख्या दिली ती अशी, "शास्त्र हे बुद्धिमंतांनी बुद्धिमंतासाठी बुद्धिवादाच्या बळाने निर्माण केलेली वस्तू आहे. तीतून बुद्धिवाद काढून घेतला, तर शास्त्रपण कोठे राहील ? .'बुद्धि-वादाने शास्त्रात वेदिली पसरते' या विधानाचा खरोखर काही अर्थच कळत नाही. शास्त्र म्हणजे काय प्रमाणावाचून, तर्कावाचून काहीही सांगण्याचा आणि ते भाबडेपणाने ऐकून घेण्याचा मामला आहे?" [काव्यप्रकाश ०२५८] ते भाबडेपणाने ऐकून घेण्याचा मामला नाही म्हणूनच वाईंनी शास्त्रातील वेदिलीची दखल घेतलेली आहे. 'शास्त्र हे शास्त्र होईल की नाही, एवढीच चिंता त्याने वहावयाला हवी.' हे म्हणणे युक्तिसंगत आहे. 'शास्त्र हे बुद्धिमंतांनी . तर मग शास्त्रपण राहील कोठे ?' हे खटकते. त्या शास्त्रात केवळ बुद्धि-वादाचाच गोंधळ असला तर त्याला शास्त्रपण येईल का ? बुद्धीतून शास्त्रांची निर्मिती होते हे सांगायला नको. पण ही बुद्धी ग्रहताऱ्यांच्या शोधात न रमता केवळ अकलेचे तारे तोडण्यात खर्च होत असली तर ते पाहून कुणाला धन्यता वाटणार आहे ? शास्त्र हे प्रमाण आणि तर्क यांच्या आधारे चालते हे कबूल. पण प्रमाणाचे प्रामाण्य आणि तर्काची कर्कश कावकावच त्यात अधिक असेल तर त्याबद्दल समाधान कोण मानेल ? बुद्धिवादाचे कौतुक करावयाला हरकत नसावी. पण काथ्याकुटाचा वीट आला तर त्याबद्दल तक्रार नसावी. संस्कृत अलंकार-

अनुक्रमणिका

शास्त्र हे जोवर काव्यसापेक्ष होते तोवर ते तालावर होते. त्याला कुणी बोल लावीत नाही. पण काव्यनिरपेक्ष अशी चर्चा ज्यावेळी व्हायला लागली; अलंकाराच्या भेदाचे उपभेद निर्माण व्हायला लागले; आणि या भेदातून पुन्हा भेद होऊन बुद्धिभेद होण्याची पाळी आली, त्यावेळी अलंकारशास्त्र हे बेताल झाले. आणि त्यामुळे 'यापुढे ही वाढ बंद' असा इशारा बाईंना द्यावासा वाटला.

काव्यशास्त्रातूनच अलंकारांचे शास्त्र जन्मणे अपरिहार्य आहे. त्यातूनच निघालेल्या तत्त्वांचा उपयोग झाला नाही तर अनाठायी बुद्धी चालविल्याबद्दल जरा विषादच 'वाटेल.' हे त्यांचे वाटणे योग्यच आहे. आणि याच वाटण्यामुळे ते व्यवहार्य आहे. वरील तत्त्वानुसारच जर शास्त्र निर्माण होत असेल तर ते आपोआपच व्यवहार्य होऊन जाते. ते नियम त्यातूनच उद्भवून त्यांच्यासाठीच उपयोगात आणण्यात येतात. कोणत्याही शास्त्राकडे दृष्टी टाकली तर ते केवळ शास्त्र (शास्त्रांचे शास्त्रसुद्धा) न राहता व्यवहार्य असल्याचे दिसून येते. म्हणूनच त्यांची वाढ झपाट्याने होत आहे. आजच्या ह्या 'कॉस्मिक' युगात कोणते शास्त्र असे आहे की ते व्यवहार्य नाही ?

शिवाय शास्त्रातील मतभेद हे काही सीमेपर्यंत ठीक असतात. ज्या भेदातून नुसते भेदच निर्माण होतात आणि त्यांची अखंड परंपरा कायम राहून त्यामुळे मूळ मुद्द्यालाच बगल मिळण्याचा संभव निर्माण होतो ते मतभेद अनाठायी म्हणून त्याज्य होत. वायफळ मतभेदातून एकही फळ हाती लागत नसताना, मग चर्वितचर्वण व्यर्थ झाल्यास नवल ते काय ?

ह्या गोष्टीचा विचार करण्याचे कारण ही विचारसरणी पुरस्कृत करून ह्या लेखक महाशयांनी अलंकारांच्या अबाढव्यसंख्येची वाढ योग्य ठरविलेली आहे. ती कितीही वाढली तरी त्याला हरकत नसावी अशी यांची धारणा आहे. पण ती अयोग्य आहे.

बाळूताई खऱ्यांची मुख्य विचारसरणी अशी की काव्यातूनच अलंकारांची निर्मिती होते व ती तशी व्हावी. ही दृष्टी सुटली म्हणजे त्यातून निर्माण होणाऱ्या परिणामाची प्रतिक्रिया वेगळी होते. ती अलंकारांच्या भेदोपभेदामुळे कशी झाली याचे सोदाहरण विवेचन त्यांनी केलेले आहे. जुने ते सोने म्हणून अलंकार मांडणाऱ्यापासून तो नवीन अलंकार घडविणाऱ्यापर्यंत हीच विचारसरणी असलेली आढळते. आणि संस्कृत शास्त्रातील संख्यावादीचे तत्त्व कुणालाच मान्य नाही ही वस्तुस्थिती आहे. शिवाय अलंकारशास्त्र हे काव्यातून निर्माण व्हावे म्हणून 'काव्याची भूषणे' आणि 'नवीन अलंकार' पुढे आलेले आहेत.

'काव्यलोचनकारां'नी आपल्या ग्रंथात संस्कृत शास्त्रज्ञांच्या वर्गीकरणाच्या तत्त्वांचे नवनीत घुसळून शेवटी सार काढले ते असे, "तात्पर्य, अलंकारांचे वर्गीकरण करून त्यांना शिस्त लावण्याची, इतकेच नव्हे तर शास्त्राची जी श्रेष्ठ

अवस्था, की अलंकारतत्व शोधून काढणे हेही संस्कृत ग्रंथकारांनी केलेले आहे." हे सर्व ठीक आहे. पण पुढील पण महत्त्वाचा आहे. ते म्हणतात, "पण अलंकारांची यादी पाहिली की मग मात्र मूळची वर्गीकरणाची शास्त्रीय दृष्टी सुटली असे म्हणणे प्राप्त होते. एका एका अलंकाराचे सूक्ष्म भेद छेडण्यात कुशाग्रतेचे लाड पुरविले गेले असले तरी मार्मिकतेचे हाल झालेले आहेत याची या पृथक्करणपटूंना विस्मृती पडलेली दिसते." [काव्यालोचन, पृ. ३३६] उपमेच्या अठ्ठेचाळीस भेदांना आणखी नवीन नावे न देण्याबद्दल त्यांनी उपहासगर्भ धन्यताच मानली. वरील विधानाजवळ बाळूबाईंचे विधान बसविल्यास त्यातील एकवाक्यता दिसून येईल. म्हणून कुशाग्रबुद्धीने अनाठायी पैपैशाची व्यवस्था पाहण्यात आणलेला कारकूनी आव अनाठाई ठरावा हे योग्यच आहे. ह्या 'संख्या नियमना'बद्दल आणि नामांतराबद्दल रंगाचार्य रड्डी आणि जोग यांचे एकमत आहे. जोगांनी 'काव्यालोचना'तील अलंकारांच्या यादीविषयी असे उद्गार काढले की, "या यादीत अलंकारांची अतिरिक्त संख्या कमी करणे, नवीन अलंकारांचा समावेश करणे व जुन्या संस्कृत अलंकारांपैकी स्पष्टार्थबोधक नसलेल्यांची नावे बदलणे अशी योजना असल्याने **संस्कृत अलंकारांच्या अभ्यासाविषयी अनेकांना वाटणारी अप्रीती राहणार नाही, व अलंकारांचे प्रकरण आजच्यासारखे अवजड न राहता सुटसुटीत होईल."** [अभिनव काव्यप्रकाश, २७३–७४, जाड टाईप माझा] बाईंनी शास्त्र हे 'व्यवहार्य' व 'सुगम' असावे असे जे म्हटले त्याला ही पुष्टीच आहे. आता तरी त्या द्वयांना 'व्यवहार्य' 'सुगम' याचा अर्थ सुगम व्हावा.

तात्पर्य, वाङ्मयातून उपयोगात आणलेल्या किंवा उपयोगात येणाऱ्या अलंकारांवरूनच त्याच्या तत्त्वांचा विचार होणे आवश्यक आहे. त्यायोगे संख्येचा प्रश्न आपोआपच सुटू शकेल. अलंकारांच्या नामकरणाचा प्रश्न विशेष महत्त्वाचा आहे. प्रचलित रूढ नावे सोडून नवी नावे प्रचारात येतील का हा प्रश्न आहे. ती येणार नाहीत असेच वाटते. कारण 'अलंकारा'चे 'विभ्रम' झालेले आहेत हे केवळ त्या पुस्तकातील उल्लेखावरून व त्या शब्दावर झालेल्या टीकेवरून जाणवते. 'विभ्रम' ह्या शब्दाचा जोरदार पुरस्कार व उपयोग कोठेच आढळत नाही. श्री. द. के. केळकरांनी इतर अलंकारांचे केलेले नामकरण पुस्तकजमाच आहे.

सारांश, अलंकारांची तात्त्विक चर्चा शून्य संशोधन ठरू नये ही दृष्टी असणे आवश्यक आहे. संस्कृत आणि इंग्रजीचा प्रभाव मराठीवर आहे तसेच मराठीचे स्वतंत्र वैशिष्ट्य. गोंडस रूप वरून वाढत आहे. ह्या सर्व गोष्टींचा सामग्र्याने विचार करून मराठीतील अलंकारशास्त्र निर्माण होण्याचा समय येऊन ठाकला आहे.

अनुक्रमणिका

एक उपेक्षित मानकरी   कै. रामभाऊ गुळवणी

लेखक   मधुकर

आवाजाची दुनिया ही जवळ जवळ नष्ट होत चालली आहे असे जर म्हटले तर मला वाटतं ती अतिशयोक्ती मुळीच होणार नाही. आवाज वनवणे हा प्रकार कसा नष्ट झाला याची कारणे अनेक देता येतील. परंतु षड्ज साधून, आवाज मंद्र सप्तकात ठेऊन त्याला रुंदी आणणे व त्याला पीळदार व पल्लेदार करणे हा कष्टसाध्य प्रकार आज दुर्मिळ आहे. पण प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा अत्यंत कष्टाने हा प्रकार ज्यांनी साध्य केला होता व शेवटपर्यंत टिकवला होता असे गायक म्हणजे कै. रामभाऊ गुळवणी.

बाळपणापासून गायकीचे संस्कार होण्यासाठी ज्या गोष्टींची आवश्यकता असते, त्यांपैकी प्रत्येक गोष्ट रामभाऊंच्या वाटचाला आली होती. रामभाऊंचे वडील कै. बाळुबुवा राशिवडेकर हे कोल्हापूर जिल्ह्यातील राशिवडे गावच्या विठ्ठल मंदिराचे पुजारी. त्यांनी ग्वाल्हेर घराण्याचे अध्वर्यू गायनाचार्य बाळकृष्ण-बुवा इचलकरंजीकर ह्यांचेकडे पाच वर्षे धृपद धमाराची तालीम घेतली होती. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांचे तीन उत्तम शिष्य म्हणजे हे एक बाळुबुवा, दुसरे विष्णु दिगंबर पलुस्कर व तिसरे अनंत मनोहर जोशी. "बाळकृष्णबुवा-सारखा स्वरेल गंधार, मध्यम मी अजून ऐकला नाही." असे त्यांच्याकडे शिक्षण घेतलेले श्री. वामनराव सडोलीकर आजही म्हणतात. अशा संस्कारक्षम वाता-वरणात रामभाऊंच्या गायकीचा पाया रचला गेला.

रामभाऊंचे शालेय शिक्षण कसेबसे दोन इयत्ता झाले. शाळेत डिपोटींना स्वरात कविता गाऊन दाखविण्यासाठी म्हणून बरोबरीची मुले त्यांना धरून शाळेत न्यायची तितकेच शाळेचे दर्शन. शालेय शिक्षणापेक्षा संगीतकलेकडेच त्यांचा ओढा अधिक होता. त्यांच्या घरच्या संगीताच्या संस्कारक्षम वातावरणात वयाची नऊ वर्षे सहज निघून गेली.

ह्याच सुमारास रामभाऊंचा नाटकाशी संबंध आला व तो नंतर बरीच वर्षे टिकला. गावातील हौशी लोकांनी 'संगीत शारदा' केले. त्यात रामभाऊ शारदा झाले होते. नंतर लगेच कोल्हापूरला कै. बाबा देवल ह्यांनी रामभाऊंना कै. केशवराव भोसले ह्यांच्यासमोर एक पद म्हणायला सांगितले. आणि रामभाऊंचे गाणे ऐकून केशवरावांनी त्यांना आपल्या कंपनीत ठेवून घेतले. केशवरावांच्या अत्यंत कडक शिस्तीत रामभाऊंच्या गायकीला घडण मिळाली.

अनुक्रमणिका

नाटकातील पदांबरोबरच शास्त्रीय गायकीचे शिक्षण त्यांना निरनिराळ्या गायकांकडून देण्यात आणि रामभाऊंच्या गायकीवर निरनिराळ्या गायकीचे संस्कार करवण्यात केशवरावांनी बिलकूल कसूर केली नाही. केशवरावांच्या ह्या ऋणाचा रामभाऊ नेहमी कृतज्ञतेने उल्लेख करीत.

कै. दशरथबुवा मुळे हे एक सुरेल गायक कंपनीत गायनमास्तर होते. त्यांच्या-जवळ प्रथम रामभाऊ स्वरज्ञान शिकले. शिवाय कंपनीत नेहमीच नामवंत गायकांची गाणी व्हायची. त्यात अब्दुल करीमखाँ व वझेबुवा, सवाई गंधर्व हे प्रामुख्याने असत. अशा वातावरणात, गायनाचा ध्यास घेतलेले रामभाऊ आठ आठ, नऊनऊ तास मेहनत करीत.

मिळालेल्या संगीत शिक्षणावरच समाधान न मानता रामभाऊंनी निर-निराळ्या घराण्यातील गायकीची चांगली वैशिष्टचे आत्मसात केली. जे चांगले ते शिकण्याची व आपल्या गायकीतील उणीवा दूर करण्याची त्यांची धडपड शेवट-पर्यंत होती. 'मी जन्मभर विद्यार्थी आहे' असे ते नुसते म्हणतच नसत तर त्याप्रमाणे वागत. म्हणूनच रामभाऊंच्या गायकीत, स्वतंत्र प्रतिमेबरोबरच, ग्वाल्हेर, किराणा व जयपूर घराण्याच्या गायकीचा मोहक समन्वय झाल्याचे दिसून येई. या तीन घराण्यांची वैशिष्टचे त्यांनी विद्यार्थी वृत्तीने, अभ्यासाने व अत्यंत कष्टाने आत्मसात केली होती. स्वर मजबूत करून ख्याल, अस्ताई अंत्रा भरणे हे ग्वाल्हेर घराण्यातील प्रमुख वैशिष्टच कै. वझेबुवांच्या सहवासात ते शिकले. वझेबुवा त्यांच्या शिष्याला, म्हणजे केशवराव भोसल्यांना, तालीम देत तेव्हा रामभाऊ तंबोरा घेऊन बसत व केशवरावांना मिळालेली तालीम सतत त्यांच्या कानावर पडे. स्वरांचा विलास हे किराणा घराण्याचे वैशिष्टच अब्दुल करीमखां यांचे जलसे ऐकून ऐकून रामभाऊंनी आत्मसात केले. पण स्वर खुला व मजबूत ठेवून जयपूर घराण्याचे वैशिष्टच (जे आज फक्त काही मोजक्याच गायकांच्या गाण्यात दिसते.) म्हणजे तान पलटा, तानेचा दाणा हा—काराने टाकून सपाट येणे हा कठीण प्रकार आजकाल दिसत नाही. हा प्रकार रामभाऊंनी कष्टाने आत्मसात केला, ते गानमहर्षी अल्लादियाखां यांचे चिरंजीव मंजीखां यांचे गाणे ऐकून. एकदा इंदूरला सर्कलमध्ये मंजीखां यांचे गाणे होते, त्या दिवशी मंजीखांनी बिहारी रागातील "हो निंद न आये" या चीजेचा मोहरा एका तानेच्या मोहक लडीने असा बांधला व ते आवर्तन इतक्या तेजस्वितेने घेतले की त्याचे वर्णन शब्दात करणे कठीण.

त्या गोष्टीचा ध्यास रामभाऊंनी त्याक्षणीच घेतला. लगेच दुसऱ्या दिवसा-पासून त्याची अंमलबजावणीही सुरू झाली. परंतु तो प्रकार गळचातून निघेना त्यामुळे रामभाऊ बेचैन झाले. परंतु नवीन गोष्ट साध्य करण्याच्या बाबतीत रामभाऊंच

स्वभाव जिद्दी होता. तीनचार दिवस रामभाऊ व मंजीखां ह्यांचा मुक्काम इंदूरचे श्रीमंत रामूभैय्या दाते यांच्याच घरी होता. शेवटी एका संध्याकाळी सहज बोलता बोलता रामभाऊंनी खांसाहेबाजवळ ही गोष्ट काढली व आपली ही उणीव बोलून दाखविली. खांसाहेब म्हणाले, "रामा, तुम्ही नाटक धंद्यातून निवृत्त झालेले तरुण गायक. तुमचा आवाज अप्रतिम. परंतु स्वर उंच व त्यामुळे आवाजाला रुंदी कमी. तेव्हा तानेचा दाणा विखरणार कसा ?" खांसाहेबांनी रामभाऊंना त्यांचा स्वर पांढरी चारवरून काळी दोन वर आणायला सांगितला व "ह्या स्वरात नेहमी गात जा, प्रथम त्रास झाला तरी नंतर तुला ते पटेल" असे सांगितल्यावर रामभाऊ उमगले. त्यांना त्यांचा 'सूर' सापडला. ह्यानंतर सतत तीन वर्षे मेहनत करून त्यांनी तानपलटा तयार केला. तो प्रकार त्यांनी इतका आत्मसात केला होता की, १९५३ साली धारवाड येथे झालेल्या बैठकीत रामभाऊंच्या गायकीला "हे आमच्याच घराण्याचं गाणं आहे" असे जयपूर गायकीचे प्रतिनिधी श्री. मल्लिकार्जुन मन्सूर म्हणाले होते.

चोरट्या आवाजात तीन सप्तकांची तान मारणाऱ्या गवयांच्या गाण्याला कडाडून टाळी वाजविणाऱ्या आजच्या श्रोत्यांना रामभाऊ कसा खणखणीत षड्ज लावीत, त्यांचे गाणे कसे जोरकस होते व त्यांच्या गाण्यात किती जरब होती हे कळणार नाही. त्यांचे जोरकस गाणे ऐकूनच त्यांना संगीतसम्राट खांसाहेब रजबअली म्हणाले, "भैय्या रामभाऊ, इतना ताकतवर गाना मत गाते जाव. लोगोंकी नजर लग जायेगी."

गायनातील सर्व प्रकार रामभाऊंनी आत्मसात केले होते. त्यांच्या गायकीत एक ढंग होता. शास्त्रीय ख्यालगायकीइतकीच मराठी पदेसुद्धा ते ढंगदार म्हणत. मानापमानातील व इतर नाटकांतील पदांबरोबरच बालगंधर्वांनी लोकप्रिय केलेले पदसुद्धा ते अत्यंत उत्तम रीतीने म्हणत असत. रामभाऊ गज्जल हा प्रकारसुद्धा अतिशय उत्तम म्हणत. "अब उनका क्या भरोसा" ही गज्जल म्हणावी रामभाऊंनीच, अशी त्यांची ख्याती. गाण्याबरोबरच तबला वादनामध्येही त्यांनी प्राविण्य मिळवलं होतं. केशवराव भोसल्यांच्या कंपनीत असतानाच रामभाऊंना सुप्रसिद्ध तबलिये भास्करराव चौगुले ह्यांची तालीम मिळाली होती. त्यानंतर मेहनतीने त्यांनी तबलावादनात इतकं कौशल्य मिळविलं की बालगंधर्वाच्या नाटकात खांसाहेब थिरकवांच्या अनुपस्थितीत रामभाऊ साथ करीत आणि तीही प्रभावीपणे.

थोर लोकांकडून गौरविल्या गेलेल्या रामभाऊंना अव्वल दर्जाची कला अवगत असूनही फारशी प्रसिद्धी मात्र मिळाली नाही. अंगी कला असूनही प्रसिद्धी मिळवण्याचं एक तंत्र असतं. गायनांच तंत्र त्यांना साधलं पण प्रसिद्धी मिळवण्याचं

अनुक्रमणिका

तंत्र काही त्यांना साधलं नाही. याचं कारण त्यांचा स्वभावही होता. जितके ह्यांचे गाणे जोरकस, आक्रमक तितकाच त्यांचा स्वभाव नम्र. तालाला जितके पक्के तितकेच व्यवहाराला कच्चे. जितक्या खुल्या आवाजात षड्ज लावीत तितकेच स्वभावाने लाजाळू व बुजरे. ज्याप्रमाणे समाजात वावरताना लाजाळू आणि बुजरा वाटणाऱ्या व्यक्तीचं खरं व्यक्तित्व त्याच्या खास लोकांच्या सहवासातच फुललेलं आढळतं, त्याप्रमाणे रामभाऊंच्या कलेचं होतं. खुल्या बैठकीत रामभाऊंचं गाणं रंगत असे त्यापेक्षा कितितरी अधिक पटीनं रंगत असे खास रसिकांच्या बैठकीत.

आजच्या गायकात दुर्मिळ असलेले गुण, अत्यंत हालअपेष्टा सोसून रामभाऊंनी प्राप्त केले होते. ज्यांनी आपलं आयुष्य कलेशी प्रामाणिक राहून वेचलं, निर्मळ अंतःकरणाने जन्मभर स्वरांची सेवा केली व जिद्दीने अव्वल दर्जाची कला हस्तगत केली त्यांना प्रतिकूल परिस्थितीशी झगडत फाटक्या कपड्यानिशी जीवन जगावं लागलं. पण रामभाऊ एक मैफली माणूस होता. त्याची साक्ष त्यांचे अनेक अंतेवासी देतील. एका मैफलीला हजेरी लावायला जात असतानाच त्यांचा अंत व्हावा ही गोष्टही सूचक आहे.

पुस्तक परीक्षण

एका पथिकाची जीवनयात्रा

[लेखक **मोरेश्वर वासुदेव जोशी,** प्रकाशक ग. रा. भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ३४, किंमत रु. ५-००]

ही आहे एका मास्तराची जीवनगाथा ! मास्तराच्या आयुष्यात सुख थोडे अन् दु:ख मोठे ! श्री. मो. वा. जोशी हेही त्याला अपवाद नाहीत. पण त्यातल्या त्यात त्यांनी आपले जीवन सुसह्य करण्याचा खंबीरपणे प्रयत्न केला, हेच त्यांच्या जीवनयात्रेचे वैशिष्टय.

आत्मचरित्र म्हटले की त्यात स्वत:कडे निव्वळ मोठेपणा घेण्याचा आणि दुसऱ्यांवर शितोडे उडविण्याचाच प्रकार पुष्कळदा आढळून येतो, असे म्हटले जाते. परंतु प्रस्तुत आत्मचरित्र वाचताना वरील तऱ्हेचा आक्षेप किती भोंगळ आहे, हे पटेल.

श्री. जोशी यांनी आत्मचरित्र का लिहिले ? त्यांच्या आयुष्यात असे विशेष काय घडले की ज्यामुळे त्यांनी आत्मचरित्र लिहून लोकांना आगळा मार्ग दाखवावा ? सामान्यांचं जीवन आणि त्यात निर्माण होणाऱ्या समस्या सर्वसामान्यांच्या आयुष्यात वादळ करून उठतातच. पण सर्वांकडून काही आत्मचरित्र लिहून होत नाही. काहीतरी सांगण्यासारखं असतं म्हणून आत्मचरित्र लिहिल्या जातं, असं म्हणणं सयुक्तिक होईल. सामान्यांच्या असामान्य कर्तृत्वाचा विशेष इतरांना कळायचा कसा ? तोच विशेष श्री. जोशी यांनी आत्मचरित्र लिहून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

'घाटा'वरून 'देशा'वर येईपर्यंत श्री. जोशी यांनी आपल्या बाळपणच्या क्षणकाळाचे, जीव पिळवटून काढणारे, पण त्यातूनहि जीवन जगून दाखविण्याची पराकाष्ठा करणारे अनुभवाचे विशाल चित्र रेखाटले आहे. त्यांनी जीवनातील चढउतार कसकसे अनुभवले आणि शेवटी सुखी जीवन जगण्यातील आनंद कसा असतो, याचे खुमासदार, चटकदार वर्णन प्रस्तुत 'जीवनयात्रे'त स्पष्ट झाले आहे. सर्वसामान्य घराण्यातल्या पोराची झालेली ससेहोलपट---त्यातून मार्ग चोखाळणारे श्री. जोशी हे मनाने खंबीर होते, वृत्तीने खेळकर होते म्हणूनच निभावून गेले. स्तुती-निंदेचा विचार न करता आणि आपला ध्येयमार्ग आक्रमून शेवटच्या मुक्कामावर येऊन पोचल्यावर आपल्या जीवनाकडे वळून पाहणारे

श्री. जोशी मनाचा निर्धार करून 'माझ्या या जीवनयात्रेत ज्यांनी मला दुःख दिले, त्यांच्यावरचा राग सोडून देण्याचा मी यत्न करतो. ज्यांना मजपासून दुःख झाले त्यांची पदर पसरून क्षमा मागतो.' असं स्वच्छ मनानं म्हणून ते मोकळे झाले आहेत.

हे आत्मचरित्र वाचताना श्री. जोशी यांच्या अवतीभवती वावरणाऱ्या व्यक्ती, तसेच काहींच्या खाष्ट–दुष्ट स्वभावांमुळे निर्माण झालेली परिस्थिती यातून ते कसे वागले––तसे का वागले ह्याचे शब्दचित्र त्यांनी फार छान रेखाटले आहे. नातेवाईकांकडून मिळणारी विचित्र वागणूक, प्रकृतिमान तोळामासा, शिक्षणाची झालेली हेळसांड, पितृछत्राला मुकावे लागल्यामुळे पोटाची वीतभर खळी भरण्याची मारामार, इत्यादि घटनांचे वावते वर्णन वाचकांच्या मनाला घरे पाडतात.

मास्तरकीची नोकरी मिळवून मुंबईसारख्या अफाट शहरात राहून जीवन सुखकर करण्याचा प्रयत्न करणारे श्री. जोशी यांचा पिंड साहित्यिकाचा आहे, हे आत्मचरित्र वाचताना जाणवल्याशिवाय राहत नाही. घरगुती प्रसंगांतून बाहेरील अफाट जगात प्रवेश केल्यावर ऊन–पावसाच्या खेळाकडे मजेने पाहणारे श्री. जोशी, मनाने जितके हळवे आहेत तितकेच वेळप्रसंगी प्रसंगाला तोंड देऊन जीवन सुसह्य करणारे आणि आपल्या जिव्हाळ्याच्या परिवारात रमणारे एक 'कुटुंबवत्सल' हि आहेत.

सरळमार्गी, कोणाच्या अध्यात ना मध्यात, असे जीवन जगून आयुष्याची संध्याकाळ बघणारे श्री. जोशी यांचे आत्मचरित्र वाचनीय झाले आहे. ह्या आत्मचरित्र–लेखनामुळे मराठी चरित्र वाङ्मयात मोलाची भर पडली, असे म्हणणे अतिशयोक्तिपूर्ण ठरू नये.

हरिभाऊ : विविध दर्शन —संपादक : प्रा. म. ना. अदवंत;

[प्रकाशक : दा. ना. मोघे, स्कूल अँड कॉलेज बुकस्टॉल कोल्हापूर; मूल्य रु. १०]

मराठीतील श्रेष्ठ कादंबरीकार कै. हरि नारायण आपटे यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने प्रस्तुत लेखसंग्रह प्रसिद्ध करण्यात आला. हरिभाऊंच्या कालखंडाचा विचार केल्यास त्यांचे समग्र वाङ्मय वाचायला पाहिजे आणि त्या दृष्टीने तत्कालीन समाजाच्या अंतरंगात प्रवेश करून मनोमन अभ्यासही झाला पाहिजे, असे वाटू लागले आहे. परंतु सामग्र्याने हरिभाऊंच्या विविध लेखन प्रवृत्तींवर जे काही नव्याने लिहिले जाईल त्याचा अभ्यास होणे आवश्यकच आहे. या दृष्टीने विचार करून व अनेकविध विषयांचे आयोजन कल्पून प्रा. म. ना. अदवंत यांनी 'हरिभाऊ विविध दर्शन' हा लेखसंग्रह प्रसिद्ध केला.

या लेखसंग्रहात, हरिभाऊंच्या भिन्न भिन्न वाङ्मयप्रकारांवर समालोचनात्मक १८ लेख घालण्यात आले आहेत.

या लेखसंग्रहाचे तीन भाग करण्यात आले असून पहिल्या भागात हरिभाऊंचे 'चरित्र आणि व्यक्तिमत्व' हा लेख दिला आहे. दुसरा भाग म्हणजे 'साहित्य-समालोचना'चा. त्या विभागातील लेख हरिभाऊंच्या भिन्न भिन्न वाङ्मयकृतींवर आणि लेखनामागील प्रेरणांवर आहे. तिसऱ्या भागात हरिभाऊसंबंधी 'काही विचार' मांडणारे लेख आहेत..

हरिभाऊंच्या कादंबरीलेखनाचा विचार करताना, तत्कालीन महाराष्ट्रीय पांढरपेशा समाजाचे जीवन त्यांच्या एकत्र कुटुंबपद्धतीमुळे, कसे गुंतागुंतीचे झाले होते आणि त्यावेळच्या धार्मिक समजुती जीवनाला जाचक होणाऱ्या असल्यामुळे परिणामतः समाजाची अवनती कशी होत गेली, यावर प्रकाश टाकण्यासाठी हरिभाऊंनी लिखाण केले. त्यामागील ध्येय आणि प्रवृत्ती यांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने प्रस्तुत लेखसंग्रहातील श्री. ल. ग. जोग यांचा 'हरिभाऊंची सामाजिक कादंबरी' हा लेख आणि कुमुदिनी घारपुरे यांचा 'सामाजिक कादंबऱ्यांतील स्त्री सृष्टी' हा लेख अभ्यासण्यासारखा आहे. हरिभाऊंनी वेळोवेळी जे पत्रलेखन केले, त्यातून त्यांचे विचार कसकसे उन्नत होत गेले व याच जाणिवेतून त्यांच्या हातून समाजाचे उन्नयन—वाङ्मयाच्या द्वारे—कसे झाले याचा अभ्यास नव्याने करण्याची आवश्यकता आहे, असे वाटते. त्या दृष्टीने श्री. चंद्रशेखर बर्वे यांचा 'पत्रातून दिसणारे हरिभाऊ' हा लेख वाचावा. हरिभाऊंनी ऐतिहासिक कादंबरी का लिहिली, त्यामागील त्यांचा उद्देश कोणता, याचा सूक्ष्म धागा काही लेखांमधून सापडतो.

हरिभाऊंनी अनेक वाङ्मयप्रकार हाताळण्याचा प्रयत्न केला. परंतु काव्य हाहि त्यांनी हाताळलेला वाङ्मयप्रकार सर्वसामान्यपणे आजच्या वाचकाला ठाऊक नाही. यादृष्टीने प्रा. भ. श्री. पंडित यांनी लिहिलेला 'हरिभाऊंची कविता' हा लेख उल्लेखनीय आहे. यातच हरिभाऊंच्या विविधतेची जाणीव वाचकांना होईल. हरिभाऊंवरील वैचारिक लेखांमध्ये डॉ. सु. रा. चुनेकर यांनी लिहिलेला लेख अवश्य वाचून पहावा. त्यांनी आपल्या लेखात, 'हरिभाऊंची कादंबरी समकालाशी कशी निगडित आहे आणि कालप्रवृत्ती जाणून घेतल्याशिवाय ती कशी पूर्णपणे समजणार नाही, हे त्यांच्या कादंबरीतील विविध वादविषय, वेगवेगळे विचार, घटना, व्यक्ती बघितल्यानंतर लक्षात येते,' असे स्पष्ट विधान केले आहे. आजघडीला हरिभाऊंचे कादंबरी वाङ्मय आजच्या पिढीला आपलेसे वाटत नाही; त्याविषयी जवळीक वाटत नाही; म्हणूनच वरील विधानात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या वाङ्मयाचा विचार होणे आवश्यक आहे.

अनुक्रमणिका

अशा विविध विचारांनी संपन्न असलेल्या अन्य लेखांकडेही डोळसपणे पाहिले पाहिजे. आणि त्यामागील भिन्न भिन्न मतप्रणाली समजावून घेतली पाहिजे.

प्रा. अदवंतांनी हरिभाऊनिर्मित वाङ्मयावरील विविध दृष्टिकोन हेरून, त्या त्या पैलूंवर प्रकाश टाकण्यासाठी विविध लेखांचे संपादन केले. प्रा. श्री. के. क्षीरसागर, डॉ. मा. गो. देशमुख, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर आणि प्रा. वा. ल. कुळकर्णी यांनी हरिभाऊंच्या वाङ्मयावर जे विचार व्यक्त केले ते सर्वमान्य होतील आणि तत्संबंधी अधिक विचार करण्यास वाव मिळेल अशी अपेक्षा आहे.

असा हा विदग्धपूर्ण लेखसंग्रह संपादन करण्यात संपादकाने जो चोखंदळपणा दाखविला तो अभ्यासकांना हरिभाऊंच्या वाङ्मयाचा अधिक अभ्यास करण्यास प्रवृत्त करण्यासाठीच ! त्या दृष्टीने केलेला हा बहुमोलाचा प्रयत्न यशस्वी होईल अशी अपेक्षा आहे.

—**हरिहर येगावकर**

अधांतर––[लेखक : **विजया राजाध्यक्ष**; प्रकाशक मौज प्रकाशन, मुंबई; किंमत—७ रु. ५० न. पैसे]

१९५५ ते १९६४ पर्यंतच्या दशकात लिहिलेल्या कथांचा संग्रह. निम्म्यापेक्षा जास्त कथांचे सत्यकथा, मौज या नियतकालिकांतून प्रकाशन. त्यामुळे नवेपणाची अभिजात प्रतिष्ठा लाभलेली नवकथेच्या आधाराने होणारी वाटचाल. ती आणि तो मधील रुंजी घालणाऱ्या भावनांचा पाठशिवणीचा खेळ, त्याचे संयमित, संथ टिपण, हा लेखनाचा विशेष. आधुनिक शिक्षणाने संस्कारित झालेल्या स्त्रीच्या आंतर्मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न. संग्रहास अधांतर हे नाव ' फुटेल होती वेडी आशा ' ह्यातील शेवटच्या तीन चार वाक्यांतून प्रस्फुरित झाले असावे. " उंच माणसे " आणि " अवघ्या अभाग्यांचे अश्रू " ह्या कथा " कथेपेक्षा " नीतिमूल्या-साठी अवतरल्या असाव्यात. अवघ्या ' अभाग्याच्या अश्रू 'मध्ये देसायांचे ओले डोळे कथा परिणामकारक करीत नाहीत. Emotion recollected in tranquility ही कथालेखनाची बैठक आहे. ' उशीर ' ही कथा उल्लेखनीय आहे. एक अभ्यास ह्या दृष्टीने वाचनीय आहे. संग्रहातील काही कथा पु. भा. भावे यांनी लिहिल्या असत्या आणि शेवटली ' संदर्भ ' य. गो. जोशी यांनी लिहिली असती तर त्या कथा कशा उतरल्या असत्या, असा विचार मनात उगाच येऊन जातो.

मा. नी. ग.

' युगवाणी 'कडे अभिप्रायार्थ आलेल्या पुस्तकांची साभार पोच

ऑगस्ट-सप्टेंबर १९६५

१ लोकसाहित्य-साजशिणगार	संपादक-डॉ. सरोजिनी बाबर, प्रसिद्धी संचालनालय, सचिवालय, मुंबई; कि. रु. २-००
२ अगदी स्टेप बाय स्टेप	लक्ष्मीबाई टिळक, बॉम्बे ट्रस्ट अँड बुक सोसायटी, मुंबई; कि. रु. ०-५०
३ विठ्ठल विठ्ठल गजरी (काव्य)	न. रा. धुळकर, प्र. न. धुळकर, आर्टिस्ट सीताबर्डी, नागपूर; कि. रु. १-५०
४ ज्वारीचा हुरडा (काव्य)	
५ वैदिक वाङ्मयातील भागवत धर्माचा विकास	डॉ. शं. दा. पेंडसे, व्हीनस प्रकाशन, 'तपश्चर्या', ३८१ क शनिवारपेठ, पुणे २, कि. रु. ६-००
६ दलितांचे जग : वेदना आणि शिष्टाई	ना. रा. शेंडे, दीप प्रकाशन; धंतोली, नागपूर; कि. रु. ४-००
७ जयनाद (कवितासंग्रह)	संचालक, प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई;
८ Kokani of South Kanara	एम. ए. घाटगे, सरकारी मुद्रण लेखनसामग्री, महाराष्ट्र, मुंबई;
९ रायगडची जीवनकथा	शां. वि. आवळसकर, महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृति मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई;
१० देशनांक निर्देशांक	चं. न. डाफाळ,
११ होमिओपाथिक औषधांचा निघंटु	डॉ. शं. र. फाटक

१२ आरोग्य आणि आहारशास्त्र	प्रा. शांता केळकर,
१३ योक होता राजा	सौ. सुहास वि. पठारे, रविप्रिन्टस, शारदाश्रम, भवानीशंकर रोड, मुंबई २८, कि. रु. ०–८०
१४ गंध रेखा (कवितासंग्रह)	कवि ' नागेश ' नवनवोन्मेष प्रकाशन मलकापूर; कि. रु. १–००
१५ अनूपराग विलास	डॉ. कुमार गंधर्व, मौज प्रकाशन गृह, मुंबई; ४ कि. रु. १५–००
१६ गारंबीचा बापू (नाटक)	श्री. ना. पेंडसे, मौज प्रकाशन गृह, मुंबई; ४ कि. रु. ३–००
१७ यशोदा (नाटक)	श्री. ना. पेंडसे, मौज प्रकाशन, गृह मुंबई; ४ कि. रु. २–५०
१८ डोह	श्री. वि. कुळकर्णी, मौज प्रकाशन, गृह, मुंबई; ४ कि. रु. ६–००
१९ पाटलाच्या पोरीचं लगीन	विजय तेंडुलकर, मौज प्रकाशन गृह, मुंबई; ४ कि. रु. १–००
२० मराठ्यांचा सत्तेचा उत्कर्ष ...	अनुवादक न. र. फाटक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, सचिवालय, मुंबई ४
२१ अंकुर	संपादक : पं. ख. नागपुरे, सुनील प्रकाशन, हिवरखेड (जि. अकोला) कि. रु. १–००
२२ कस्तुरी मृग	नारायण रा. पेडणेकर, कस्तुरी मृग प्रकाशन : १२, इसाक महंमद चाळ, भवानीशंकर रोड, दादर, मुंबई; २८ कि. रु. २–००

संघवार्ता

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस, वि. सा. संघ यांजकडून

मनोरंजनाचे कार्यक्रम

विदर्भ साहित्य संघातर्फे दि. १८ सप्टेंबर ६५ रोजी रात्री ९ वाजता धनवटे रंगमंदिरात डॉ. कुमार गंधर्व यांचे गायन झाले.

दि. १९ व २० सप्टेंबर ६५ रोजी रात्रौ ९ वा. सदानंद जोशी यांनी 'मी अत्रे बोलतोय' हा एकपात्री कार्यक्रम सादर केला.

भेट

श्रीमती निर्मलाराजे भोसले, समाज कल्याणमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि. १९ सप्टेंबर ६५ रोजी संस्थेला भेट दिली.

न्या. मू. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा

कै. न्या. मू. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा, विदर्भ साहित्य संघातर्फे दि. २२ ते २४ सप्टेंबर १९६५ या तारखांना आयोजित करण्यात आली. वादस्पर्धेत एकूण २४ महाविद्यालयांनी भाग घेतला.

यावर्षी अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयाला फिरती रौप्य ढाल मिळाली. कु. प्रतिभा तेलंग, विदर्भ महाविद्यालय अमरावती यांना १०० रुपयांचे वैयक्तिक पारितोषिक मिळाले असून ६० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाल्याबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले.

श्री. व्ही. बी. देशपांडे, गव्ह० पॉलिटेकनिक नागपूर यांना ७५ रुपयांचे वैयक्तिक पारितोषिक मिळाले. यांनाही ६० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाल्याबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले.

कु. मीरा धर्माधिकारी, एम्. एन्. मुन्शी, कु. मीरा सुकळीकर, यांनाही ६० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाल्यांबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले. शुक्रवार दि. २४ सप्टेंबर १९६५ रोजी वरीलप्रमाणे वादस्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात

आला. श्री. पी. एस. मुळगावकर, डेप्यु. डायरेक्टर ऑफ एज्युकेशन, विदर्भ विभाग, नागपूर, यांच्या हस्ते बक्षिस वितरण–समारंभ झाला.

या वादस्पर्धेचे वेळी तीनही दिवस परीक्षक म्हणून श्री. मा. नी. गलगलीकर, श्री. चंद्रशेखर माडखोलकर आणि सौ. ताराबाई शास्त्री यांनी सहकार्य दिले.

निमंत्रित वक्ते अॅड. चंद्रशेखर धर्माधिकारी, आणि श्री. चंद्रशेखर माडखोलकर यांनी स्पर्धेच्या विषयावर भाषण दिले.

श्री. वा. गो. चोरघडे यांनी पाहुण्यांचे, परीक्षकांचे आणि उपस्थितांचे आभार मानले.

शाखावृत्त

काटोल —

काटोल शाखेतर्फे दि. ९।९।६५ रोजी संघाध्यक्ष प्रा. वा. कृ. चोरघडे यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. शाखाध्यक्ष श्री. जीवनलालजी चांडक यांनी अध्यक्ष प्रा. वा. कृ. चोरघडे, सरचिटणीस श्री. बाबुराव चिमोटे, 'युगवाणी'चे संपादक श्री. मा. नी. गलगलीकर यांचे पुष्पहार घालून स्वागत केले. उत्तरादाखल प्रा. चोरघडे यांनी 'जीवनातून फुलते ते खरे साहित्य' हा विचार अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केला.

अमरावती —

अमरावती शाखेची निवडणूक दि. १८ सप्टेंबर ६५ रोजी घेण्यात आली. त्यावेळी ६५–६६ सालाकरिता पुढील कार्यकारिणी निवडून आली.

अध्यक्ष—श्री. सुरेश भट, उपाध्यक्ष—प्रा. सुरेश ना. भावे, कोषाध्यक्ष—श्री. श्री. स. पेंढरकर, चिटणीस–प्रा. भाऊ मांडवकर, श्री. न. रा. निमजे, सदस्य—श्री. सुदाम सावरकर. सदहू कार्यकारिणीवर डॉ. वि. भि. कोलते हे पदसिद्ध सदस्य असून केंद्रीय कार्यकारिणीच्या अध्यक्षांतर्फे प्रा. डी. के. देशमुख यांना नियुक्त करण्यात आले.

श्री. वि. स. खांडेकर पारितोषिक

श्री. वि. स. खांडेकर सत्कार समिति, पुणे ह्या संस्थेने रुपये ८००१ चा निधी विदर्भ साहित्य संघाचे स्वाधीन केला असून या रकमेच्या व्याजातून महाराष्ट्रातील नागपूर, मराठवाडा, पुणे, मुंबई व कोल्हापूर या विद्यापीठांतून

बी. ए. परीक्षेत मराठी ऐच्छिक विषयात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रत्येकी रुपये ८० ची रोख श्री. वि. स. खांडेकर पारितोषिके देण्यात येतात.

त्यानुसार यंदा मार्च–एप्रिल ६५ मध्ये झालेल्या बी. ए. मराठी ऐच्छिक विषयात प्रथम येणाऱ्या पुढील विद्यार्थ्यांना श्री. वि. स. खांडेकर पारितोषिके जाहीर करण्यात आली.

१. नागपूर विद्यापीठ—कु. सरोजबाला जगदीश वर्मा, यवतमाळ

२. मराठवाडा विद्यापीठ – कु. पुष्पा किसनराव माथेकर, वाडगाळी (परभणी)

३. पुणे विद्यापीठ—श्रीमती लीला श्रीधर एकबोटे, अहमदनगर

४. मुंबई विद्यापीठ—कु. शशिकला रघुनाथ साठे, मुंबई

५. श्री शिवाजी विद्यापीठ—श्रीमती आशा भालचंद्र सबनीस, सावंतवाडी.

परीक्षा समितीवृत्त

सप्टेंबर ६५ सत्राच्या परीक्षा दि. ११ आणि १२ सप्टेंबर ६५ रोजी घेण्यात आल्या. यावेळी भिन्नभिन्न केंद्रांतून एकूण ११५० विद्यार्थी परीक्षेस बसले.

मराठी प्रवेश—१०६, मराठी परिचय—१८; मराठी बोध—१०; मराठी प्रबोध—२५; मराठी प्रारंभ—१८८; सा. विनीत—४८४; सा. परिचय—६२; साहित्य प्रबोध—१२५; सा. स्नातक—१३१; साहित्यपारंगत खंड २ रा—१ एकूण = ११५० विद्यार्थी.

अमराठी भाषिकांसाठी नव्याने सुरू केलेल्या म. प्रवेश, म. परिचय बोध, म. प्रबोध या चार परीक्षांना एकूण १५९ विद्यार्थी परीक्षेस बसले. या परीक्षांना यापुढे अधिक प्रमाणात विद्यार्थी बसतील, अशी अपेक्षा आहे.

आगामी सत्रातील परीक्षा जानेवारी ६६ मध्ये होतील. नवीन केंद्र घेऊ इच्छिणाऱ्यांनी आवेदनपत्रांची मागणी करावी.

ग. स. देशपांडे
संचालक, परीक्षासमिती

अनुक्रमणिका

'युगवाणी' दिवाळी अंक

कथा——उद्धव शेळके, कुंदा पारसनीस, वसंत वऱ्हाडपांडे, मनोहर तल्हार, तारा शास्त्री, प्रभाकर धोटे, अनंत पाटील, कमलाकर धारप इत्यादि.

एकांकिका——' यक्ष '

ललित लेख——वामन इंगळे

मुलाखत——आंतरराष्ट्रीय कलाकार श्री. विनायकराव मसोजी यांची मुलाखत नि परिचय

' मेरे बडे भाई '——शरच्चंद्र मुक्तिबोध

कविता——शरच्चंद्र मुक्तिबोध, या. मु. पाठक, भ. श्री. पंडित, गु. ह. देशपांडे, म. म. देशपांडे, ग्रेस, गुणाकर देशपांडे, मनोहर वझे, उषा लिमये, प्रभाकर सिरास, वसंत डहाके, श्रीधर शनवारे, बाबा मोहोड, तुळशीराम काजे, उ. रा. गिरी.

लेख— वामनराव चोरघडे, पां. ब. गाडगीळ, मधुकर मंगरूळकर, के. ए. पोतदार, धनंजय नाकाडे, श्रीकांत राय इत्यादि.

अंकाचे मूल्य रु. २-००

एजंटांनी मागणी नोंदवावी. व्ही. पी. पद्धत नाही.

पत्ता——**विदर्भ साहित्य संघ, सीताबर्डी, नागपूर.**

मुद्रक पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १.

प्रकाशक मा. गो. गलगलीकर, विदर्भ साहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १.